रायगड, नवी मुंबई
राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक ९८
www.ramprahar.com
◆ रविवार, २६ ऑक्टोबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

कर्जत पोसरी येथे उल्हास नदीत आढळला मृतदेह/२
रविवारनिमित्त विविध विषयांवरील लेख/४, ६
ऑस्ट्रेलियाविरुद्ध तिसऱ्या वनडेत भारताची सरशी/८

## शिक्षक पात्रतेसाठी सीटीईटी परीक्षा ८ फेब्रुवारीला

**पुणे :** केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे (सीबीएसई) घेण्यात येणारी केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षेची (सीटीईटी) घोषणा करण्यात आली आहे. त्यानुसार ८ फेब्रुवारी रोजी ही परीक्षा देशभरातील १३२ शहरांमध्ये आयोजित केली जाणार आहे. राज्य परीक्षा परिषदेतर्फे राज्य स्तरावरील शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) आयोजित केली जाते, तर राष्ट्रीय पातळीवर सीबीएसईतर्फे सीटीईटी ही परीक्षा घेण्यात येते. सीबीएसईतर्फे वर्षातून दोनवेळा परीक्षेचे आयोजन केले जाते. उमेदवारांना शिक्षक होण्यासाठीची पात्रता प्राप्त करण्यासाठी टीईटी किंवा सीटीईटी यातील कोणतीही परीक्षा उत्तीर्ण होता येते. ८ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या सीटीईटीमध्ये पेपर १ आणि पेपर २चा समावेश असणार आहे. परीक्षेबाबतची सविस्तर माहिती, अभ्यासक्रम, पात्रता, परीक्षा शुल्क व केंद्र असलेली शहरे याबाबतचा तपशील स्वतंत्रपणे जाहीर केला जाणार आहे.

### फलटण महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरण

# कुणालाही सोडणार नाही, कठोर कारवाई करणार!

**मुंबई : प्रतिनिधी**

फलटणमधील महिला डॉक्टरच्या आत्महत्येची घटना अतिशय दुर्दैवी आणि धक्कादायक आहे. या घटनेत आम्ही कुणालाही सोडणार नाही. जे कुणी आरोपी असतील त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे.

साताऱ्याच्या फलटण शहरातील उपजिल्हा रुग्णालयात कार्यरत असलेल्या संपदा मुंडे या महिला डॉक्टरने हॉटेलमध्ये आत्महत्या केल्याने खळबळ उडाली होती. मृत डॉक्टरने आत्महत्येपूर्वी स्वतःच्या तळहातावर सुसाइड नोट लिहिली असून त्यात पोलीस उपनिरीक्षक गोपाळ बदने याने तिच्यावर चार वेळा बलात्कार केला, तर प्रशांत बनकर याने चार महिने शारीरिक व मानसिक छळ केला, असे नमूद केले आहे. या प्रकरणी फलटण शहर पोलीस ठाण्यात गुन्हा झाला असून तपास सुरू आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाची तत्काळ

## मुख्यमंत्र्यांची स्पष्टोक्ती



दखल घेत साताऱ्याचे पोलीस अधीक्षक तुषार दोशी यांच्याशी संपर्क साधत यातील एक आरोपी पोलीस उपनिरीक्षक गोपाळ बदनेला निलंबित करण्याचे आदेश दिले. यासोबतच या प्रकरणाचा सखोल तपास करून दोन्ही आरोपींवर कठोर कारवाई करण्याचे निर्देशही दिले होते. त्यानुसार बदनेला शुक्रवारीच निलंबित करण्यात आले.

या संदर्भात प्रसारमाध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, खूपच गंभीर प्रकरण आहे, कारण एक तरुण डॉक्टर स्वतःच्या हातावर आपल्या मनातील वेदना लिहून आत्महत्या करते ही आमच्यासाठी एक दुःखद गोष्ट आहे. त्यामुळे सरकारने कालच जो संबंधित पोलीस अधिकारी आहे, त्याला निलंबित केले आहे. अटक करण्याचे कामही सुरू करण्यात आले आहे. कोणालाही सोडले जाणार नाही. जे कोणी सहभागी असतील त्यांना कठोरता कोठोर शिक्षा दिली जाईल.

या प्रकरणात विरोधक जे राजकारण करण्याचा प्रयत्न करत आहेत, ते खूप चुकीचे आहे. इतक्या संवेदनशील प्रकरणात, जेथे एका तरुण डॉक्टरचा मृत्यू झाला आहे, त्यातही राजकीय पोळी भाजण्याचे काम करणे ही असंवेदनशीलता आहे, असेही मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे.

## प्रशांत बनकरला अटक आणि कोठडी



**सातारा, पुणे :** फलटण उपजिल्हा रुग्णालयातील महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरणातील एक संशयित आरोपी प्रशांत बनकर याला पोलिसांनी शनिवारी (दि.२५) पहाटे पुण्यातून अटक केली. त्याला कोर्टामध्ये हजर केले असता चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार मयत महिला डॉक्टर ही फलटणच्या विद्यानगरमध्ये पेईंग गेस्ट म्हणून वास्तव्यास होती. घरमालकाचा मुलगा प्रशांत बनकर हा या प्रकरणात संशयित आरोपी असून महिलेने हातावर लिहिलेल्या सुसाईड नोटमध्ये प्रशांतने तिचा शारीरिक व मानसिक छळ केल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे बनकर याच्या अटकेनंतर आता त्याचा डॉक्टरशी नेमका काय संबंध होता आणि आत्महत्येआधी काय घडले होते हेदेखील तपासात स्पष्ट होणार आहे.

घटनेनंतर पोलिसांची पथके दोन आरोपींच्या शोधासाठी रवाना केली होती. यातील संशयित आरोपी प्रशांत बनकर याला पोलिसांनी पुण्यातून बेड्या ठोकल्या. प्रशांत बनकर हा पुण्यात मित्राच्या फार्महाऊस लपून बसला होता, अशी माहिती समोर येत आहे. त्याला न्यायालयाने २८ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.


## फरारी गोपाळ बदनेचा शोध सुरू



फलटण आत्महत्या प्रकरणात महिला डॉक्टरच्या हातावर चारवेळा बलात्कार केला म्हणून ज्याचे नाव होते तो पोलीस उपनिरीक्षक गोपाळ बदने याचा पोलीस कसून शोध घेत आहेत. त्याचे शुक्रवारी शेवटचे लोकेशन पंढरपूर होते. तोही बीड परिसरातील असल्याने साताऱ्यावरून बीडकडे जाताना त्याने बहुदा पंढरपूर परिसरात फोन बंद केलेला असावा, अशी माहिती आहे. पोलिसांची सर्व पथके बदनेचा ठावठिकाणा शोधत आहेत.

## पुन्हा चक्रीवादळ; यलो अलर्ट जारी

**पुणे : प्रतिनिधी**



अरबी समुद्रात सलग पंधरा दिवसांत दुसरे चक्रीवादळ तयार होत आहे. रविवारी (दि.२६) कमी दाबाच्या पट्ट्याचे रूपांतर चक्रीवादळात होऊन सोमवारी (दि.२७) आणि मंगळवारी (दि.२८) त्याचे महाचक्रीवादळात रूपांतर होणार आहे. त्यामुळे राज्यातील अवकाळी पावसाचा मुक्काम ३० ऑक्टोबरपर्यंत वाढला असून हलका ते मध्यम पावसाचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे.

पंधरा दिवसांपूर्वी अरबी समुद्रात शक्ती नावाचे चक्रीवादळ तयार झाले होते. त्यामुळे राज्यात पाऊस वाढला होता. परतीच्या मान्सूनच्या वेळीच हे चक्रीवादळ आले होते. त्यानंतर २६ ऑक्टोबर रोजी दुसरे चक्रीवादळ मध्यपूर्व अरबी समुद्रात वेग घेत आहे. २७ व २८ रोजी त्याचे महाचक्रीवादळात रुपांतर होणार असल्याने भारतीय किनारपट्टीला सावधानतेचा इशारा देण्यात आला आहे. प्रामुख्याने आंध्र प्रदेश, कर्नाटक, केरळ किनारपट्टीवर याचा प्रभाव पडू शकतो. महाराष्ट्रात मात्र कमी प्रभाव असला तरी राज्यात हलका ते मध्यम पावसाचा अंदाज आहे.

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त पनवेलमध्ये 'संगीत मॅरेथॉन'

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गोरगरिबांचे आधारस्तंभ, थोर दानशूर व्यक्तिमत्व, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त उत्कर्ष संगीत मैफिलतर्फे मराठी आणि हिंदी सुमधूर ७५ गाण्यांचा बहारदार कार्यक्रम अर्थात संगीत मॅरेथॉनचे आयोजन येत्या शनिवारी (दि. १ नोव्हेंबर) पनवेलमध्ये करण्यात आले आहे.

गायक गोपाळ पाटील यांच्या संकल्पनेतून हा भव्य सांगीतिक कार्यक्रम पनवेलमधील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात सकाळी ११.३० ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत सलग होणार आहे. या कार्यक्रमात ते स्वतः ७५ गाण्यांचे मनमोहक सादरीकरण करणार असून उरण, पनवेल आणि नवी मुंबईतील ७५ गायकांचाही सहभाग लाभणार आहे.

लोकनेते रामशेठ ठाकूर हे राजकारणापेक्षा समाजकारणाला प्राधान्य देणारे म्हणून ओळखले जातात. गेल्या पाच दशकांहून अधिक काळ त्यांनी सामाजिक कार्याची अखंड परंपरा जपली



आणि हे कार्य त्यांच्याकडून अखंडपणे सुरूच आहे. यंदा त्यांनी आपल्या वयाच्या ७५व्या अर्थात अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण केले. त्या निमित्ताने कीर्तन महोत्सव, भजन स्पर्धा, रक्तदान शिबिर, शिधा वाटप, विविध क्रीडा स्पर्धा, नाट्य महोत्सव, वक्तृत्व स्पर्धा असे विविध समाजोपयोगी उपक्रम झाले असून पूर्ण वर्षभर अनेक सामाजिक कार्यक्रम होणार आहेत. त्याच अनुषंगाने उत्कर्ष संगीत मैफिल प्रस्तुत ७५ गाण्यांची संगीत मॅरेथॉन रंगणार असून रसिक प्रेक्षकांनी या अनोख्या गायनपर्वाचा लाभ घ्यावा, असे आवाहन गायक गोपाळ पाटील आणि सहकारी गायकांनी केले आहे.

## निवडक

### बंगळुरूमध्ये अभिनेत्रीकडून हिट अ‍ॅण्ड रन; गुन्हा दाखल

**बंगळुरू :** कन्नड चित्रपटसृष्टीतील अभिनेत्री आणि बिग बॉसची माजी स्पर्धक दिव्या सुरेश हिच्या कारने बंगळुरूच्या बायतरयनपुरा परिसरात ४ ऑक्टोबरच्या मध्यरात्री बाईकला धडक दिली. या अपघातात एक महिला गंभीर जखमी, तर इतर दोन प्रवासी किरकोळ जखमी झाले आहेत. धडक दिल्यानंतर दिव्याने पळ काढला. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल करून अधिक तपास सुरू केला आहे.

### त्र्यंबकेश्वर देवस्थान ट्रस्टतर्फे मुख्यमंत्री सहाय्यता निधीला मदत

**ओझर :** श्री त्र्यंबकेश्वर देवस्थान ट्रस्टतर्फे मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी एक कोटी ११ लाख रुपयांचा धनादेश शनिवारी (दि. २५) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे ओझर विमानतळ येथे सुपूर्द करण्यात आला. या वेळी मंत्री गिरीश महाजन, देवस्थानचे सचिव तथा मुख्याधिकारी राहुल पाटील, विश्वस्त, विशेष कार्य अधिकारी, लेखापाल आदी उपस्थित होते.

## अभिनेते सतीश शाह यांचे निधन



**मुंबई : प्रतिनिधी**

टीव्ही आणि बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेते सतीश शाह यांचे निधन झाले आहे. ७४ वर्षांचे शाह किडनीच्या आजाराने त्रस्त होते. त्यांनी शनिवारी (दि. २५) दुपारी २.३० वाजता हिंदुजा हॉस्पिटलमध्ये अखेरचा श्वास घेतला.

सतीश शाह यांनी अनेक हिंदी सिनेमांमधून आपल्या अभिनयाने प्रेक्षकांची मने जिंकली. 'हम साथ साथ है', 'मै हूँ ना' ते टीव्हीवरील 'साराभाई व्हर्सेस साराभाई'मधील त्यांच्या भूमिका गाजल्या होत्या.

सतीश शाह यांचा जन्म २५ जून १९५१ रोजी झाला. पुण्यातील एफटीआयआयमधून त्यांनी अभिनयाचे शिक्षण घेतले. ८० दशकापासूनच त्यांनी अभिनयाला सुरुवात केली होती. नसीरुद्दीन शाह यांच्या 'जाने दो भी यारो' सिनेमात त्यांनी काम केले. 'ये जो है जिंदगी' या मालिकेत त्यांनी ५५ एपिसोडमध्ये वेगवेगळ्या भूमिका केल्या. २००४ साली आलेली त्यांची 'साराभाई व्हर्सेस साराभाई' मालिका खूप गाजली. यात त्यांची इंद्रवदन साराभाई ही भूमिका होती. शाह यांनी २००पेक्षा अधिक सिनेमांमध्ये काम केले. 'हम साथ साथ है', 'कल हो ना हो', 'मै हूँ ना', 'चलते चलते', 'मुझसे शादी करोगे' अशा अनेक सिनेमांचा समावेश आहे. त्यांच्या निधनाने मनोरंजनविश्वातून हळहळ व्यक्त होत आहे. रविवारी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार होणार आहेत.

## राज्यात उद्यापासून दक्षता जनजागृती सप्ताह

**मुंबई : प्रतिनिधी**

भ्रष्टाचार निर्मुलनासाठी जागरूकता निर्माण करण्याच्या हेतूने दरवर्षी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या ३१ ऑक्टोबर या जन्मदिनापासून दक्षता जनजागृती सप्ताह साजरा केला जातो. या वर्षी २७ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर या कालावधीत या सप्ताहानिमित्त राज्यभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

यंदाच्या सप्ताहाची संकल्पना 'दक्षता आपली सामायिक जबाबदारी' अशी ठेवण्यात आली असून राज्य शासनाच्या सर्व विभागांमध्ये या अनुषंगाने विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. सप्ताहाची सुरुवात २७ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता भ्रष्टाचार निर्मुलनाच्या प्रतिज्ञेने होणार असून सर्व शासकीय कार्यालयांमध्ये ही प्रतिज्ञा घेण्यात येईल. त्यानंतर राज्यपाल आणि मुख्यमंत्री यांनी दिलेले संदेश वाचून दाखवले जातील तसेच हे संदेश राज्यातील जनतेपर्यंत विविध माध्यमांद्वारे पोहोचविण्यात येतील.

## आशियाई युवा क्रीडा स्पर्धेत भारताला कबड्डीत 'दुहेरी सुवर्ण'

**मनमा (बहारीन) : वृत्तसंस्था**

बहारीनमध्ये सुरू असलेल्या आशियाई युवा क्रीडा स्पर्धेत भारताने कबड्डीमध्ये आपला दबदबा सिद्ध करत दुहेरी सुवर्णपदक जिंकले. मुलांच्या आणि मुलींच्या दोन्ही कबड्डी संघांनी अंतिम सामन्यात इराणचा पराभव करून सुवर्णपदकावर आपले नाव कोरले.

मुलांच्या अंतिम सामन्यात भारताला इराणने जोरदार प्रतिकार केला, मात्र भारताने ३५-३२ अशा फरकाने इराणचा पराभव करून सुवर्णपदक मिळवले. यापूर्वी मुलांच्या संघाने बांगलादेश, श्रीलंका, पाकिस्तान, इराण, बहारीन आणि थायलंडविरुद्ध विजय नोंदवत अपराजित राहण्याचा



विक्रम कायम ठेवला.

मुलींच्या संघाने मात्र अंतिम सामन्यात ७५-२१ अशा मोठ्या फरकाने इराणचा धुव्वा उडवत एकतर्फी विजय मिळवला आणि सुवर्णपदकावर शिक्कामोर्तब केले. मुलींच्या संघानेही साखळी फेरीत बांगलादेश, थायलंड, श्रीलंका आणि इराणविरुद्ध विजय मिळवत अव्वल स्थान राखले होते.

विजेत्या खेळाडूंचे रविवारी (दि. २६) सकाळी ११.२० वा. मुंबई विमानतळावर टर्मिनल नंबर २ येथे आगमन होईल.

## नेरळ-माथेरान मिनीट्रेन १ नोव्हेंबरपासून धावणार



**नेरळ : प्रतिनिधी**

अनियमित पावसामुळे नेरळ-माथेरान मिनीट्रेन यंदा मान्सूननंतर अद्याप सुरू झालेली नाही. त्यामुळे पर्यटक 'माथेरानच्या राणी'च्या प्रतीक्षेत असताना ती अखेर १ नोव्हेंबरला धावेल, अशी माहिती मध्य रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. स्वप्नील नीला यांनी दिली.

माथेरान परिसरात झालेल्या अतिवृष्टीमुळे मिनीट्रेन मार्गावर अनेक ठिकाणी माती वाहून गेली असून कड्यावरचा गणपती परिसरात मोठ्या प्रमाणात भूस्खलन झाले आहे. या ठिकाणी रेल्वे ट्रॅकखालील भाग कमकुवत झाल्याने सुरक्षा भिंत उभारण्याचे काम सध्या युद्धपातळीवर सुरू आहे. पावसामुळे कामाचा वेग मंदावला असून रेल्वे विभागाने या अडथळ्यांवर मात करण्यासाठी गती दिली आहे.

नेरळ येथील स्टेशन मास्तर गुरूनाथ पाटील यांनी अलीकडेच माथेरान मार्गावरील रेल्वेस्थानकांची पाहणी केली. त्यांनी प्रसारमाध्यमांशी थेट बोलणे टाळले असले तरी मिनीट्रेन लवकर सुरू करण्यासाठी आमचे प्रयत्न सुरू आहेत. काही महत्त्वाची कामे मार्गी लागल्यानंतर मालवाहू ट्रेनची ट्रायल घेतली जाईल आणि त्यानंतरच अधिकृत घोषणा होईल, असे सांगितले होते.

दरम्यान, अमन लॉज ते माथेरान ही शटलसेवा सध्या सुरू असून पर्यटकांना तिचा आनंद घेता येतो आहे. मुसळधार पावसातसुद्धा ही सेवा अखंडित सुरू राहिली आहे. त्यामुळे माथेरानला येणाऱ्या पर्यटकांना काही प्रमाणात दिलासा मिळत आहे.

**माथेरानची मिनीट्रेन १५ ऑक्टोबरपासून सुरू करण्याचा आमचा प्रयत्न होता, मात्र सततच्या पावसामुळे ते शक्य झाले नाही. आता साधारण १ नोव्हेंबरला नेरळपासून माथेरान मिनीट्रेन सुरू करण्यात येणार आहे.**

**-डॉ. स्वप्नील नीला, मुख्य जनसंपर्क अधिकारी, मध्य रेल्वे**



# रिद्धपूर येथे जागतिक कीर्तीचे विद्यापीठ साकारणार -मुख्यमंत्री

## ३८वे अखिल भारतीय महानुभाव परिषद अधिवेशन

**नाशिक : प्रतिनिधी**

रिद्धपूर या तीर्थक्षेत्राने मराठी भाषा जीवंत ठेवण्याचे काम केले असून तेथे मराठी भाषा विद्यापीठ स्थापन करण्यात आले आहे. हे विद्यापीठ जागतिक कीर्तीचे व्हावे यासाठी प्रयत्न करण्यात येतील. यासोबतच महानुभाव पंथाच्या समस्या सोडविण्यात येतील, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

येथील जयशंकर लॉन्स येथे आयोजित अखिल भारतीय महानुभाव परिषदेच्या ३८ व्या अधिवेशनात ते बोलत होते. यावेळी जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, खासदार भास्कर भगरे, आमदार प्रवीण तायडे, आमदार अमोल जावळे, आमदार दिलीप बनकर, आमदार देवयानी फरांदे, आमदार सीमा हिरे, माजी आमदार बाळासाहेब



सानप, परिषदेचे नवनिर्वाचित राष्ट्रीय अध्यक्ष मोहन कारंजेकर बाबा, महंत सुकेणकर बाबा, महंत चिरडेबाबा, महंत कृष्णराज बाबा मराठे, प्रकाश नन्नावरे, दत्ता गायकवाड आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, सर्वज्ञ चक्रधर स्वामी यांनी देशातील सामान्य माणसाला आध्यात्मिक दिशा दाखविण्यासोबतच समाजात समता स्थापन करण्याचा विचार दिला. त्यांनी आपल्या साहित्याने मराठी भाषा समृद्ध केली, महानुभाव विचारांबरोबर मराठी भाषेला अभिजात भाषा म्हणून रुजविण्याचे कामही केले. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी लीळाचरित्र आणि ज्ञानेश्वरी हे ग्रंथ उपयुक्त ठरले.

या काळात तयार झालेल्या साहित्यातून समकालिन महाराष्ट्राचा भूगोल, इतिहास, संस्कृतीची माहिती मिळते. ते सांस्कृतिक वाटचालीचा ठेवा आहे. विविध आक्रमणे होऊनही महानुभाव विचार समाजात रुजूला. हा पंथ राज्य, देश आणि अफगाणपर्यंत विस्तारला आहे. या परंपरेने समतेचा विचार दिला. ही विचारसरणी राज्यासह देशासाठी महत्त्वाची आहे.

भगवान चक्रधर स्वामींनी महानुभाव पंथाच्या माध्यमातून समाजात प्रभू श्रीकृष्ण यांनी गीतेतून दिलेला विचार रुजविला, तोच संदेश समाजाला दिला. त्यांनी समाजाला सन्मार्गावर आणले. समाजात भेदाभेद, विषमता निर्माण झालेली असताना संपूर्ण समाजाला महानुभाव विचारातून एकसूत्रात बांधत त्यांना सन्मार्ग दाखविण्याचे काम चक्रधर स्वामी यांनी केले. मुख्यमंत्री झाल्यावर महानुभाव पंथाच्या स्थळांचा विकास सुरू केला, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

श्री. कारंजेकर म्हणाले, मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या सहकार्यामुळे महानुभाव परिषदेचे विविध उपक्रम मार्गी लागले आहेत. राज्य शासनाच्या माध्यमातून रिद्धपूर येथे मराठी भाषा विद्यापीठ साकारत आहे. तेथे प्रवेश प्रक्रिया होऊन अभ्यासक्रम सुरू झाले आहेत. राज्य शासनाने महानुभाव पंथाच्या विविध स्थळांच्या विकासासाठी निधी मंजूर केला.

या वेळी महानुभाव परिषदेच्या अधिवेशनास उपस्थित राहिल्याबद्दल मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अभिनंदनाचा ठराव करण्यात आला. माजी आमदार सानप यांनी प्रास्ताविक केले.

# रोहा रेल्वे यार्डाबाहेर कॉईल वाहतूक करणारा ट्रेलर उलटला

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा रेल्वे यार्डालगत असलेल्या जेएसडब्ल्यू कंपनीच्या माल उतार केंद्रावर आता पास्को कंपनीच्या अवजड लोखंडी कॉईलची चढ-उतार करण्यात येते. येथून लोखंडी कॉईल घेऊन निघालेला ट्रेलर शनिवारी दुपारी ३च्या दरम्यान रोहा रेल्वे यार्ड हद्दीच्या बाहेर येताच उलटल्याची घटना घडली.

सुदैवाने यामध्ये ट्रेलरचा चालक सुखरूप वाचवला व ट्रेलर निर्मनुष्य जागी उलटल्यामुळे कोणतीही जीवितहानी झाली नाही, मात्र झालेली घटना ही ट्रेलरची क्लिप तुटल्याने झाली असल्यामुळे जर हिच घटना रेल्वे फाटक, अष्टमी नाका, रोहा बायपास रोड, रोहा कोलाड रोड येथे झाली असता जीवितहानी होण्याचा धोका होता. या गंभीर समस्येकडे रायगडचे खासदार सुनील तटकरे यांनी गांभीर्याने लक्ष देत पास्को, जेएसडब्ल्यू या कंपन्याना स्थानिकांचे



सुरक्षेस प्राधान्य देण्याच्या सूचना कराव्यात, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

रोहा रेल्वे स्टेशनलगत जेएसडब्ल्यू या कंपनीच्या मालकीचा स्वतंत्र यार्ड आहे. या ठिकाणी देशभरातून रेल्वे मार्गाने आलेला सर्व स्थानिक उद्योगाना लागणारा सर्व प्रकारचा कच्चा माल येतो. व येथून तो जिल्ह्यातील विळे भागाड, महाड, गडब, साळाव या भागातील कंपन्या पर्यंत ढम्पर, ट्रेलरने वाहतूक करत पोहोचविण्यात येतो. अशीच आता पास्को कंपनीच्या लोखंडी कॉईलची वाहतूक येथून सुरू आहे. शनिवारी दुपारी ३ च्या दरम्यान मातोश्री ट्रान्सपोर्टचा (एमएच ४६ बीयू ७१५२) हा ट्रेलर २४ टन वजनाची लोखंडी कॉईल घेऊन पास्को कंपनी विळे भागाकडे मार्गस्थ झाला होता. त्यावेळी रोहा रेल्वे हद्द सोडून रेल्वे नवीन वसाहत व पिंगसई पंचक्रोशी येथून जाणाऱ्या रस्त्याच्या बाजूला त्याची क्लिप तुटल्या मूळे पडला. हाच ट्रेलर पुढे अष्टमी रेल्वे फाटक क्र. ५७ पार करून अष्टमी नाका, रोहा बायपास रोड, रोहा कोलाड रोड मार्गे कोलाड व पुढे भिरा फाटा मार्गे विळे भागाडकडे जाणार होता. मोठी दुर्घटना घडली असती.

# परतीच्या पावसाने शेतीचे नुकसान

## अधिकारी, कर्मचाऱ्यांनी पंचनामे वेळेत करण्याची मागणी

**अलिबाग : प्रतिनिधी**

मागील काही दिवसांपासून परतीचा पाऊस थांबायच नाव घेत नाही. त्यामुळे शेतकरी पुरता हवालदिल झाला आहे. दुसरीकडे भातशेतीच्या नुकसानीचे पंचनामे वेळेत होत नसल्याने प्रशासकीय यंत्रणेबाबत शेतकरी वर्गात संतापाचे वातावरण आहे. कृषी विभागाने आम्हाला वाऱ्यावर सोडले असून अधिकारी, कर्मचारी दिवाळी सुट्टीचा आनंद घेण्यात मग्न असल्याची शेतकऱ्यांची तक्रार आहे.

आधी दसरा, नंतर दिवाळीच्या सणातदेखील पाऊस पाठ सोडायला तयार नाही. ऑक्टोबरच्या पहिल्या आठवडयातच परतीच्या पावसाला सुरूवात झाली, परंतु १५ दिवस झाले तरी परतीचा पाऊस सुरूच आहे. संध्याकाळच्या सुमारास ढग जमा होतात आणि ढगांचा गडगडाट, विजांच्या कडकडाटासह पाऊस बरसायला सुरूवात करतो. दिवसभर कडकडीत ऊन पडत असल्याने शेतकऱ्यांनी कापणीच्या कामाची घाई केली आहे. शेतात पिकलेले धान्य घरी घेवून येण्यासाठी त्याची लगबग आहे. मात्र पावसाने या शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. दररोज संध्याकाळच्या सुमारास बरसणाऱ्या पावसाने शेतात कापून ठेवलेले भातपीक भिजून नुकसान होत आहे. दुसरीकडे शेतात साचलेल्या पाण्यात उभे पीक आडवे होवून भिजते आहे.

कृषी विभागाकडून शेतीच्या पंचनाम्याचे काम सुरू आहे, मात्र हे काम संथगतीने सुरू असल्याचा शेतकरयांचा आरोप आहे. जोपर्यंत पंचनामे होत नाहीत तोवर पीक शेतातून घरी घेवून जावू शकत नाहीर, पण कृषी विभागाचे अधिकारी, कर्मचारी पंचनाम्यासाठी येत नसल्याने भाताचे भारे घरी घेवून जाण्यात अडचणी येत आहेत. अनेक ठिकाणी कृषी विभागाचे अधिकारी, कर्मचारी जागेवर नसल्याच्या तक्रारी आहेत. फोन करून देखील ते फिरकत नसल्याच्या तक्रारी आहेत. अनेक कर्मचारी दिवाळी सुटीसाठी गावी गेल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळेच पंचनाम्याच्या कामात अडथळे येत असल्याचे शेतकरयांचे म्हणणे आहे.

यंदा सुयोग्य पावसामुळे भाताचे पीक चांगले आले आहे, परंतु परतीच्या पावसाने या पीकाची नासाडी केली आहे. दुसरीकडे कृषी विभागाकडून सहकार्य मिळत नसल्याने शेतकरी बेजार आहे. स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार सूचना करूनही त्यांच्या आदेशांना जुमानले जात नसल्याचा अनुभव शेतकऱ्यांना येतो आहे. कृषी विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार रोजचा अहवाला शासनाला पाठवला जात आहे. ऑक्टोबर महिन्यात झालेल्या पंचनाम्यांनुसार ६९१ गावातील पाच हजार ६४२ शेतकरयांचे १हजार ६९८ हेक्टर क्षेत्रावरील भातपीकाचे नुकसान झाले आहे.

**परतीच्या पावसाने झालेल्या शेतीच्या नुकसानीचे पंचनामे करण्याचे काम सुरू आहे. ज्या ठिकाणावरून तक्रारी प्राप्त होत आहेत तेथील कर्मचाऱ्यांना प्राधान्याने सूचना दिल्या आहेत. पंचनाम्याचा अहवाल शासनाला वेळोवेळी सादर केला जात आहे.**

**-वंदना शिंदे,**
**जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी**

**अलिबागच्या खारेपाट भागात कापलेले भातपीक भिजून मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे. कृषी विभागाकडे सातत्याने पाठपुरावा करून दाद मिळत नाही. अधिकारी कर्मचारी सुट्टीवर असल्याचे उत्तर मिळते. शेतकऱ्यांना कुणी वालीच राहिला नाही.**

**-सुनील पिंगळे, शेतकरी**

# तळा तालुक्यात भातपिके दुहेरी संकटात

## पावसाचा मारा आणि वन्यप्राणीही करताहेत नासधूस

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यात गेली तीन चार दिवस सायंकाळी येणाऱ्या वादळी पावसामुळे राहिलेल्या भातपिकांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. कापणी केलेली पिके भिजली आहेत तर उभी असणारी भातपिके आडवी झाल्याने नुकसान झाले आहे.या पडणाऱ्या पावसाबरोबरच वन्यप्राणी देखील शेतीचे नुकसान करत असल्याने शेतकरी वर्गातून बोलले जात आहे.

वातावरणीय बदल व परतीचा पडणारा पाऊस यामुळे



शेतकऱ्याला अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. या पडणाऱ्या पावसामुळे भातशेती आडवी झाली असून जमीनीला भाताची कणशे टेकली असून त्या कणसांना मोड येण्यास सुरूवात होईल अथवा भात कुजण्याचा धोका आहे.

काही ठिकाणी तर उभी असणाऱ्या पिकांच्या कणसांचे दाणेही गळत आहेत तसेच माकडे व डुक्कर हे वन्यप्राणीही भातशेतीचे नुकसान करत आहेत. शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी, अशी अपेक्षा सर्व स्तरांतून केली जात आहे.

# पोसरी गावाजवळ आढळला मृतदेह

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील पोसरी गावानजीक उल्हास नदीमध्ये एक अज्ञात व्यक्तीचा मृतदेह आढळला. हा मृतदेह तेथे कसा आला? याचा तपास पोलीस करीत आहेत.

शनिवारी सकाळच्या सुमारास येथील स्थानिक ग्रामस्थांना नदीच्या पाण्यावर एक मृतदेह तरंगताना दिसला. याबाबत त्यांनी कर्जत पोलिसांशी संपर्क साधला. त्यानंतर घटना स्थळी पोलीस उप बाबू दबडे, पोलीस हवालदार अनिल वडते, पोलीस शिपाई संतोष खाडे, अविनाश पोळ, सूरज साळवे, रवि लोहकरे आले. त्यांनी मृतदेह बाहेर काढला. या



मृतदेहावर कोणतीही माराची खूण नव्हती. पायात चप्पल होती.

हा मृतदेह २५ ते ३० वयोगटाचा असावा असा अंदाज असल्याचे पोलिसांनी सांगितले. हा मृतदेह परप्रांतीय व्यक्तीचा असावा. असाही अंदाज वर्तविण्यात आला. हा मृतदेह रायगड हॉस्पिटलमध्ये ठेवण्यात आला असून ओळख पटल्यावर त्याच्यावर अंत्यसंस्कार केले जातील, असे पोलिसांनी सांगितले.

# डॉलरचा मोह नडला; तीन लाखांना गंडा

**नवी मुंबई : बातमीदार**

स्वस्तात डॉलर खरेदीच्या मोहात एकाने तीन लाख रुपये गमावले आहेत. अज्ञात व्यक्तीवर विश्वास ठेवून कांदिवलीत राहणारी ही व्यक्ती डॉलर घेण्यासाठी घणसोलीत आली होती.

या वेळी त्यांच्याकडील रोकड घेऊन त्यांना डॉलरऐवजी कागदी बंडल देऊन पळ काढला. कांदिवली येथे राहणाऱ्या मोहम्मद सिद्दिकी यांच्यासोबत हा प्रकार घडला आहे. त्यांची एका व्यक्तीसोबत तोंडओळख झाली होती. या व्यक्तीने त्याच्याकडे यूएस डॉलर असून ते स्वस्तात देतो, असे सांगितले होते. त्याच्यावर विश्वास ठेवून सिद्दिकी यांनी तीन लाख रुपयांमध्ये हा व्यवहार ठरवला होता.

डॉलर घेण्याचे निश्चित झाल्यानंतर सिद्दिकी हे २० तारखेला घणसोली गावठाणालगत निर्मनुष्य ठिकाणी आले होते. त्या ठिकाणी तीन व्यक्तींनी त्यांच्याकडील रोकड घेऊन डॉलरऐवजी कागदी बंडल देऊन धूम ठोकली. या प्रकरणात आपली फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात आल्यानंतर रबाळे पोलिस ठाण्यात अज्ञात तिघांवर गुन्हा दाखल केला आहे.



**चिरनेर : संपादक जी.एच. ठाकूर यांनी संपादित केलेल्या हितवर्धक दिवाळी अंकाचे प्रकाशन सामाजिक कार्यकर्ते रवींद्र डांगर, सहाय्यक शिक्षक निवास गावंड, संपादक ठाकूर, उपशिक्षिका मनाली पाटील, उपशिक्षिका अनुष्का वारी यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. या वेळी एचडी इंग्लिश स्कूलचे विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते. सूत्रसंचालन हेमांगी ठाकूर यांनी केले.**

# शेतीच्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करण्याचे निर्देश



**मुरुड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यासह रायगड जिल्ह्यात अवकाळी पावसामुळे मोठे नुकसान झाले आहे. पावसाचे महिने संपले तरी अजून सुधा रायगड जिल्ह्यातील काही तालुक्यांमध्ये पाऊस पडल्याने तयार झालेली भातशेती व कापणी करून ठेवलेली भाताचे पिक पूर्णतः भिजून गेल्याने शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे.

याबाबत एका कार्यक्रमासाठी खासदार सुनील तटकरे कार्यक्रमासाठी आले असता मुरूड तालुक्यातील शेतकरी वर्ग यांनी माजी सभापती बाबू नागावकर यांच्या मार्गदर्शनाखाली भेट घेऊन नुकसान खूप झाले असल्याचे खासदार तटकरे यांना निदर्शनास आणून दिले. या वेळी खासदार तटकरे यांनी रायगड जिल्हाधिकारी यांच्याशी भ्रमणध्वनीद्वारे संपर्क साधून रायगड जिल्ह्यात ज्या तालुक्यांमध्ये जास्त पाऊस होऊन भातपिकाचे नुकसान झाले असेल तिथे तातडीने पंचनामे करून तो अहवाल राज्य शासनकडे पाठवण्याचे निर्देश दिले आहेत.

कोणताही विलंब न करता रायगड जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात जाऊन पंचनामे तातडीने पूर्ण करावेत जेणेकरून शेतकरी वर्गाला तातडीने मदत करता येईल. खासदार तटकरे यांनी पंचनामे करण्याचे आदेश दिल्याने शेतकरीवर्गाला मोठा दिलासा मिळणार आहे.

याबाबत खासदार तटकरे यांनी सांगितले की, अवकाळी पावसामुळे शेतकरीवर्गाचे मोठे नुकसान झाले आहे. जिल्हाधिकारी यांना पंचनामे करण्याचे आदेश दिले असून राज्य शासनामार्फत याची उचित दखल घेण्यात येऊन तत्काळ मदतीचा हात देण्यात येणार आहे. शेतकरी वर्गाने घाबरून जाऊ नये राज्य शासन आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे राहील, असे अभिवचन या वेळी त्यांनी दिले आहे.

# तुळजाभवानी मंदिरात भाविकांची गर्दी

## मुख्य प्रवेशद्वार तीन दिवस राहणार बंद

**तुळजापूर : प्रतिनिधी**

तुळजाभवानी ही अनेक कुटुंबांची कुलस्वामिनी आहे. याच कारणामुळे या मंदिरात भाविकांची नेहमीच गर्दी असते. लागोपाठ असणाऱ्या सुट्ट्यांमुळे आणि दिवाळीच्या सणामुळे सध्या मंदिरात प्रचंड गर्दी आहे. वाढलेली ही अलोट गर्दी लक्षात घेता मंदिर संस्थानाने भाविकांच्या सुरक्षिततेसाठी आणि सोयीसाठी मंदिराचा मुख्य दरवाजा बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.



मंदिर संस्थानाच्या निर्णयानुसार शनिवार आणि रविवार असे दोन दिवस मंदिराचे मुख्य प्रवेशद्वार भाविकांसाठी बंद असणार आहे. या दोन दिवसात मंदिरात येणाऱ्या भक्तांसाठी घाटशीळ बाजूकडून मंदिरात येण्याचा मार्ग खुला करून देण्यात येणार आहे.

मंदिर संस्थानांकडून आणखी एक महत्वाचा निर्णय घेण्यात आला आहे, तो म्हणजे गर्दीच्या व्यवस्थापनासाठी २०० रुपयांचे पास देखील पुढील २ दिवसांसाठी बंद करण्यात येणार आहे. यामुळे भाविकांना एकाच रांगेतून दर्शनासाठी जावे लागणार आहे. भाविकांनी मंदिर प्रशासनाला सहकार्य करावे आणि शांतता राखून देवीचे दर्शन घ्यावे, असे आवाहन मंदिर संस्थानाने केले आहे.

# रायगड जिल्हा युवा महोत्सव

## युवक-युवतींनी सहभागी होण्याचे आवाहन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

युवकांचा सर्वांगीण विकास साधणे, भारतीय संस्कृती व परंपरा जपणे तसेच युवकांच्या सुप्त गुणांना वाव देत राष्ट्रीय एकात्मता वृद्धिंगत करणे या उद्देशाने युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, भारत सरकारतर्फे दरवर्षी राष्ट्रीय युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते.

याच पार्श्वभूमीवर सन २०२५-२६ या वर्षातील राष्ट्रीय युवा महोत्सव विकसित भारत चॅलेंज ट्रॅक १० ते १२ जानेवारी २०२६ या कालावधीत पार पडणार आहे. त्याअनुषंगाने रायगड जिल्हास्तर युवा महोत्सवाचे आयोजन २९ ऑक्टोबर २०२५ रोजी करण्यात येणार आहे.

या महोत्सवात युवकांसाठी विविध स्पर्धात्मक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून त्यामध्ये वक्तृत्व स्पर्धा, कथालेखन, चित्रकला, लोकनृत्य (गट), लोकगीत (गट), कवितालेखन, नवोपक्रम (विज्ञानदर्शन) या उपक्रमांचा समावेश आहे.

स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या १५ ते २९ वयोगटातील युवक-युवती तसेच युवा मंडळांनी २८ ऑक्टोबर २०२५ रोजी सायं ५ वाजेपर्यंत आपली online नोंदणी dscraigad.2009rediffmail.com या ई-मेलद्वारे करावी.

अधिक माहितीसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, रायगड येथे संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा क्रिडा अधिकारी, प्रकाश वाघ यांनी केले आहे.

# हॅप्पी स्ट्रीट नागरिकांसाठी वाहनमुक्त

**पनवेल : वार्ताहर**

भाजप नेते उमेश इनामदार यांच्या मागणीनुसार पनवेल शहरातील वडाळे तलाव येथील हॅप्पी स्ट्रीटवर दीपावलीचा आनंद लुटाण्यासाठी हा मार्ग पूर्णपणे मोकळा वाहतूक शाखेने करून दिला.

वाहतूक शाखेचे निरीक्षक औदुंबर पाटील यांच्याकडे भाजप नेते उमेश इनामदार यांनी हॅप्पी स्ट्रीटवर दीपावलीचा आनंद लुटण्यासाठी हा मार्ग पूर्णपणे मोकळा करून द्यावा, अशी मागणी केली होती. नागरिकांसाठी केलेल्या या मागणीचा तातडीने विचार करून अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची टीम त्या स्थळी पाठवून वाहतूक निरीक्षक औदुंबर पाटील ह्यांनी हॅप्पी स्ट्रीट नागरिकांना वाहनमुक्त करून खुला करून दिला. त्यामुळे नागरिकांचा आनंद द्विगुणित झाला.



दुखवटा

## हसूराम पाटील

**उरण : बातमीदार**



उरण तालुक्यातील पाणजे गावातील सामाजिक कार्यकर्ते हसूराम महादेव पाटील (सरकार) यांचे रविवारी (दि.१२) वयाच्या ९३व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या अंत्यसमयी मोठा जनसमुदाय उपस्थित होता. पाणजे ग्रामपंचायतीचे विद्यमान सरपंच लखपती पाटील यांचे ते वडिल होते. हसूराम पाटील यांच्या पश्चात तीन मुले, चार मुली व १२ नातवंडे असा त्यांच्या कुटुंब परिवार आहे. विविध क्षेत्रातील मान्यवरांनी पाटील कुटुंबियांचे भेट देऊन त्यांचे सांत्वन केले.

# मीठ उत्पादन व्यवसाय संकटात

## बदलत्या वातावरणाचा विपरित परिणाम

**उरण : रामप्रहर वृत्त**

सातत्याने बदलणाऱ्या वातावरणामुळे पारंपरिक मीठ उद्योगही संकटात आला आहे. त्याच्या उत्पादनावर ही परिणाम झाला आहे. त्यामुळे मीठ तयार होण्यासाठी १५ऐवजी यामध्ये वाढ होऊन हा कालावधी ३० दिवसांवर पोहचला आहे. परिणामी मीठ उत्पादकांवर आर्थिक संकट ओढवले आहे.



उरण तसेच रायगड जिल्ह्यातील किनारपट्टीवर मिठागरे हा मोठा व्यवसाय होता, मात्र जिल्ह्यातील वाढत्या औद्योगिक क्षेत्रामुळे मीठ व्ययसाय कमी होऊ लागला आहे. यामध्ये उरण तालुका हा मीठ उत्पादक म्हणून अग्रेसर ठिकाण होते. येथून रेल्वेच्या माल गाडीने मीठाची वाहतूक मोठ्या प्रमाणात केली जात होती. उरणमध्ये मिठागर कामगार व मालक यांची ही संख्या अधिक आहे.

उरण परिसरात पारंपरिक मीठ उत्पादन करणारी मिठागरे सुरू असून मीठ उत्पादन केले जाते. हे मीठ तयार करण्यासाठी लागणारे समुद्राचे पाणी भरतीच्या वेळी साठवणूक तलावात घ्यावे लागते, मात्र सततच्या बदलत्या वातावरण आणि पर्यावरणावर होणारा परिणाम व मातीच्या भरावामुळे मिठासाठी लागणारे पाणी मिळत नसल्याचे मत मीठ उत्पादक किशोर म्हात्रे यांनी दिली तसेच मीठ उत्पादनासाठी लागणाऱ्या पाण्याच्या क्षाराचे प्रमाण आणि तपमान याचा मेल होत नसल्याने मीठ उत्पादसाठीच्या कालावधीत वाढ झाली आहे. त्यामुळे मीठ उत्पादकांचे नुकसान होऊ लागले आहे.

### दरही घसरले

**पर्यावरणातील बदलामुळे मीठ उत्पादनावर परिणाम झाल्याने मिठाचे दर ही कमी झाले आहेत. सध्या एक रुपये किलोने मिठाची विक्री करावी लागत आहे.**

# वनवासी कल्याण आश्रमतर्फे मिठाई, कपडे वाटप

**उरण : बातमीदार, वार्ताहर**

वनवासी कल्याण आश्रम उरण तालुक्याच्या वतीने हिंदूंचा मोठा सण दिपावली निमित्त मिठाई आणि कपडे वाटप करण्यात आले. लहूचीवाडी, कल्ले येथे मिठाई वाटप करून जनजाती बांधवांची दिवाळी गोड करण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

लहूचीवाडी, कल्ले येथील वनवासी कल्याण आश्रम चे कार्यकर्ते सुदाम पवार यांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. ॲड. आकाश शहा यांनी लहान मुलांचे खेळ घेतले, निकेतन ठाकूर यांनी पसायदान म्हणून कार्यक्रमाची सुरुवात केली. वनवासी कल्याण आश्रम उरण तालुका अध्यक्ष मनोज ठाकूर यांनी वनवासी कल्याण आश्रम बद्दल आणि आश्रमा तर्फे सुरू असलेल्या विविध उपक्रमाबद्दल उपस्थित वाडीवरील बांधवांना माहिती दिली



आणि ज्या मुलाची आश्रमात राहून शिकण्याची इच्छा आहे त्याला पुढील अभ्यासासाठी कल्याण आश्रम खर्च करेल असे सांगितले.

पाड्यात वयस्कर आजी आजोबांना मिठाई देताना त्यांच्या डोळ्यातील भाव पाहून सर्वांना समाधान वाटले.उपस्थित ३० भगिनींना नवीन साड्या, शाळेत जाणाऱ्या २५ मुलांना टोप्या तसेच उपस्थित ३० बांधावाना टीशर्ट देण्यात आले.

या कार्यक्रमासाठी जिल्हा हितरक्षा प्रमुख सुदाम पवार, वनवासी कल्याण आश्रम उरण अध्यक्ष मनोज ठाकुर, कार्यकर्ते ॲड. आकाश शाह, अर्णव ठाकूर, निकेतन ठाकूर, सुरेश नायडू ही मंडळी वाडीवरील जनजाती बांधवांना आनंद देण्यासाठी उपस्थित होते.

## निवडक

### तलावात बुडून एकाचा मृत्यू

**पनवेल :** तलावात पडून पाण्यात बुडून ३८ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाला. या घटनेची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली. दिनेश दत्ताराम पाटेकर हा चेतूज फार्म हाऊस, मालडुंगे येथे केअरटेकर म्हणून काम करतो. २२ ऑक्टोबर रोजी मालडुंगे गावाकडे जाणाऱ्या रस्त्यालगत असलेल्या पाण्याच्या तलावात पडून बुडून त्याचा मृत्यू झाला. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

### खाडीमध्ये आढळला मृतदेह

**पनवेल :** पनवेल तालुक्यातील वहाळ गावाजवळ समुद्राचे खाडीमधील पाण्यामध्ये एक ३० वर्षीय अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळून आला आहे. उलवा पोलीस या व्यक्तीच्या नातेवाईकांचा शोध घेत आहे. मयत व्यक्तीचे वय अंदाजे ३० वर्षे असून उंची अंदाजे १६५ सेंमी, बांधा मध्यम, चेहरा गोल, केस काळे वाढलेले, राखाडी रंगाचा फूल बाह्यांचा बटनाचा शर्ट, काळ्या रंगाची ट्रॅकपॅट, उजवे हातावर 'माऊली' असे मराठीमध्ये गोंदलेले, उजवे हातामध्ये धागा व ताबीज बांधलेला, डावे हाताचे अंगठ्याजवळ गोंदलेले असा पेहराव आहे. सदर इसमाबाबत कोणाला काही माहिती असल्यास उलवा पोलीस ठाणे किंवा पोउपनि शिवाजी पोफळे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### वाहनाच्या धडकेत एकाचा मृत्यू

**पनवेल :** मुंबई-पुणे जुने हायवे रस्त्यावरील दाडफाटयाजवळ अज्ञात वाहनाने धडक दिल्यामुळे एका ३५ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. मयत व्यक्तीचे अंदाजे वय ३५ वर्षे असून वर्ण सावळा, उंची ५.५ फुट, केस काळे, दाढी वाढलेली, बांधा मजबुत, नाक सरळ, अंगात पांढरा शर्ट पॅन्ट, डावे हाताचे पोटरीवर जुन्या उभ्या व आडव्या जखमा, उजव्या दंडावरती तोळ, कपाळावर मधोमध तीळ, उजव्या डोळयाचे भुवईचे बाजूस दोन इंद्याचा जुना वन, डावे काखेचे खाली दोन तीळ असा पेहराव आहे. या व्यक्तीबाबत कोणाला काही माहिती असल्यास पनवेल तालुका पोलीस ठाणे किंवा पोना प्रदिप पोपेटे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# उरणमध्ये भव्य रांगोळी प्रदर्शन




**उरण : रामप्रहर वृत्त**

उरण तालुक्यातील नामवंत ज्येष्ठ कलाकारांना अभिवादन करण्यासाठी आणि समाजात सकारात्मक संदेश पोहचवण्यासाठी रंगवल्ली कलादर्शनतर्फे रांगोळी प्रदर्शनाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. बालकलाकारांपासून ते ज्येष्ठ कलाकारांपर्यंत सर्व वयोगटातील कलावंतांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेतल्याने उरणकरांना कलेची रंगीत मेजवानी अनुभवायला मिळत आहे.

या प्रदर्शनाचे उद्घाटन उरण तालुक्यातील ज्येष्ठ कलाशिक्षिका प्रियवंदा तांबोटकर यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी उरण तालुक्यातील हौशी कलाकारांसह शालेय विद्यार्थी आणि कलेत प्रभुत्व मिळवलेले अनुभवी कलाकार उपस्थित होते. या प्रदर्शनाचे वैशिष्ट्य म्हणजे कलेच्या माध्यमातून सामाजिक संदेश पोहोचवण्याचा केलेला प्रयत्न. यंदाच्या रांगोळी प्रदर्शनाद्वारे उरण तालुक्यातील नामवंत व राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त दिवंगत कलाकारांना आदरांजली वाहण्यात आली.

यामध्ये रंगवल्ली कलादर्शनचे संस्थापक ज्येष्ठ कलाशिक्षक नंदकुमार साळवी आणि मुंबई टकसाळचे माजी प्रमुख एनग्रेव्हर वसंत गावंड यांच्या योगदानाचे स्मरण करून त्यांच्या कलेला रांगोळीद्वारे अभिवादन करण्यात आले. तसेच आम्हाला ही जगू द्या या प्रभावी मथळ्याद्वारे प्राण्यांच्या अस्तित्वाचा अधिकार अधोरेखित करणारा सामाजिक संदेशही या प्रदर्शनातून देण्यात आला आहे. प्रदर्शनात कलेचे उच्च शिक्षण घेतलेले कलाकार आतिष मंचेकर, सिद्धार्थ नागवेकर, आंतरराष्ट्रीय पुरस्कारप्राप्त स्वप्नाली मंचेकर आणि कलाशिक्षक संतोष पाटील यांनी त्यांच्या कौशल्याची झलक सादर केली. तसेच सामाजिक कार्यकर्त्या आणि अनाथांची माई म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सिंधुताई सकपाळ, स्वामी समर्थ, साधू, राधाकृष्ण यांसारख्या आध्यात्मिक व्यक्तिमत्त्वांच्या आणि विषयांच्या रांगोळ्या साकारण्यात आल्या.

या रांगोळी प्रदर्शनाला उरण परिसरातील नागरिक, कला प्रेमी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित राहून प्रचंड उत्साहात प्रतिसाद देत आहेत. या उपक्रमामुळे उरण तालुक्यातील कलेची परंपरा आणि संस्कृती अधिक उजळली आहे.

# वैष्णवी कडू बनली कमर्शियल पायलट

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरातील उत्तर रायगड जिल्हा भाजपा उपाध्यक्ष गणेश कडू यांची कन्या वैष्णवी गणेश कडू हिने कमर्शियल पायलट प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करत संपूर्ण रायगड जिल्ह्याचा अभिमान वाढवला आहे. बालपणापासूनच विमान चालवण्याचं स्वप्न मनात बाळगलेल्या वैष्णवीने चिकाटी, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या जोरावर हे यश संपादन केले आहे.

वैष्णवीच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे तिच्या कुटुंबासह संपूर्ण पनवेल परिसरात आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण आहे. तिच्या यशाबद्दल सर्वत्र कौतुकाचा वर्षाव होत असून, ती अनेक तरुणींसाठी प्रेरणादायी ठरत आहे. वैष्णवीच्या यशामुळे रायगड जिल्ह्यातील प्रत्येक मुलीला मोठी स्वप्ने पाहण्याचं आणि ती पूर्ण करण्याचं बळ मिळालं आहे, अशी भावना स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनीही वैष्णवीच्या यशाचे कौतुक करत तिचे अभिनंदन केले. वैष्णवी गणेश कडू हिने कमर्शियल पायलट प्रशिक्षण पूर्ण करून तिच्या स्वप्नांना उंच भरारी दिली आहे. तिच्या या यशामुळे केवळ



कडू कुटुंब नव्हे तर संपूर्ण रायगड जिल्ह्याचा अभिमान वाढला आहे, असे आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले.

उत्तर रायगड जिल्हा भाजपा उपाध्यक्ष गणेश कडू यांच्या कन्येच्या या यशाबद्दल आमदार ठाकूर यांनी हार्दिक अभिनंदन व्यक्त करत वैष्णवीला तिच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

आता वैष्णवी आंतरराष्ट्रीय विमानसेवा क्षेत्रात करिअर घडवण्याचा मानस बाळगते आहे. तिच्या या यशामुळे पनवेल व रायगड जिल्ह्यातील अनेक तरुणींच्या मनात उंच भरारी घेण्याचे नवे स्वप्न साकार झाले आहे.

# वाशिवली येथून तरुणी बेपत्ता

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

वाशिवली येथून वीस वर्षीय तरूणी बेपत्ता झाल्याची घटना घडली असून आकाश विनोद चुनियाने (वय २७, सध्या रा. वाशिवली, मूळ राहणार बलाखीपूर, ता.खैर, जि.अलिगड, उत्तरप्रदेश) याने नंदिनी विनोद चुनियाने (वय २०) ही घरातून मी कंगवा व इतर वस्तू आणण्यासाठी वाशिवली बाजारात जाते असे सांगून निघून गेली ती घरी परतली



नाही. याबाबत नातेवाईकांशी शोध घेतला असता ती अद्यापही मिळून आली नाही.

नंदीनी रंगाने सावळी, अंगाने मध्यम, उंची ५ फूट, चेहरा उभट, डोळे काळे, अंगात गुलाबी रंगाचा सलवार सुट, उजव्या हातात भगवान शंकराचा धागा बांधलेला, पायात गोल्डन व गुलाबी रंगाची चप्पल असे वर्णन असून रसायनी पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली मपोना कोमल पाटील अधिक तपास करीत आहेत. कोणाला आढळल्यास रसायनी पोलीस ठाण्यात संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.



**उलवे नोड : छटपूजेनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन होत असते. त्याचे नियोजन व तयारी सुरू आहे. यासाठी वहाळचे माजी उपसरपंच अमर म्हात्रे यांच्यासह गव्हाणचे माजी उपसरपंच विजय घरत, सचिन घरत, अवधेश महतो, विकास सिंग, वैभव घरत, गुलाबजी आदींनी पाहणी केली.**

# रूपेश पाटील यांच्यावर राष्ट्रवादीच्या कोकण प्रदेश संघटकपदाची जबाबदारी



**पनवेल : वार्ताहर**

रुपेश पाटील यांनी गेल्या आठवड्यात राष्ट्रवादी पक्षाची कास धरली, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या माध्यमातून त्यांनी आपल्या शेकडो पदाधिकाऱ्यांसोबत राष्टवादीत प्रवेश केला. त्यांचे कोकणातील काम पाहून आणि लोकांसोबत असलेली कनेक्टिव्हिटी पाहून त्यांना राष्ट्रवादीने निवडणुकीच्या वातावरणात पक्ष वाढीची मोठी जबाबदारी दिली आहे.

त्यांना कोकण प्रदेश संघटक तथा, पनवेल व उरण विधानसभेतील असलेल्या राजकीय अनुभवावरून त्याना दोन्ही मतदार संघ म्हणजे उरण व पनवेल मतदार संघाचे निरीक्षक म्हणून सुद्धा जबाबदारी दिली आहे.

ह्या बाबत बोलतांना रुपेश पाटील यांनी स्पष्ट केले कि राष्ट्रवादीत प्रामुख्याने तटकरे साहेबांचा अनुभव व कामाची पद्धत ह्याने मी प्रभावित झालो होतो, सामान्य लोकांपर्यंत पोहचण्याचा त्यांचा स्वभाव व त्यांचे काम उल्लेखनीय आहे, ह्याच धर्तीवर राष्ट्रवादीत कार्य करण्याचा मानस असून, उपमुख्यमंत्री अजित दादा पवार साहेब तथा प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे साहेब याना अपेक्षित असेलेले काम माझ्याकडून घडेल ह्यात वाद नाही, पनवेल आणि उरण मध्ये सुद्धा येत्या काळात राष्ट्रवादी पक्षाची महत्वाची भूमिका असेल हे हि त्यांनी स्पष्ट केले. ह्यावेळी त्यांनी मंत्री अदितीताई तटकरे व माजी आमदार अनिकेत तटकरे यांचे आभार मानले.

# पाताळगंगा परिसरात किल्ले आणि रांगोळी स्पर्धा

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पाताळगंगा परिसरातील पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट आणि गावदेवी मित्र मंडळ, वाशिवली यांच्या संयुक्त विद्यमानाने दिवाळी निमित्ताने किल्ले स्पर्धा तसेच रांगोळी स्पर्धा यांचे आयोजन करण्यात आले होते. हा उपक्रम शनिवारी (दि.२५) वशिवली येथे मोठ्या उत्साहात झाला.

पर्यावरण जनजागृतीचा संदेश देण्यासाठी या कार्यक्रमात प्लास्टिक बंदी या मोहिमेअंतर्गत वशिवली गावात कापडी पिशव्यांचे



वाटप करण्यात आले. यात रांगोळी स्पर्धेत पहिला क्रमांक अनुजा पवार, दुसरा माया विकास पाटील, तिसरा मनस्वी जाधव तर किल्ले स्पर्धेत पहिला रियांस भोईर, दुसरा प्रज्वल पारंगे, तिसरा लकी चव्हाण यांचा आला आहे.

सर्व स्पर्धकांना बक्षिसे देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून अरुण गोविंद जाधव (अध्यक्ष, पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट) उपस्थित होते. तसेच किशोर पाटील, प्रकाश झिंगे, देवीदार शिवले, अभी पाटील, विनय पाटील, समीर साळुंखे यांच्यासह वशिवली गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमातून दिवाळी सणासोबत पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत गावकऱ्यांमध्ये जनजागृती घडवून आणली गेली.



**पनवेल : तारा गावचे छायाचित्रकार लक्ष्मण ठाकूर यांच्या मातोश्री यमुना महादेव ठाकूर यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी गुरुवारी तारा येथे जाऊन कै. यमुना ठाकूर यांना आदरांजली वाहिली आणि परिवाराचे सांत्वन केले.**

# सहाय्यक पोलीस निरीक्षकाने गरीब कुटुंबासोबत साजरी केली दिवाळी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कळंबोली परिसरात रहाणाऱ्या गरीब कुटुंबातील नागरिक व मुलांना रविवारी सायकाळी विशेष सुरक्षा विभागातील सहाय्यक पोलीस निरीक्षक स्वप्नील लाटे यांनी फराळाचे साहित्य वाटप करून सामाजिक बांधिलकी जोपासली.

दिवाळीनिमित्त लखख प्रकाश, फटाक्यांची आतिषबाजी पाहून दुरूनच आनंद मानणाऱ्या चिमुकल्याच्या जीवनात फराळाचे साहित्य देवून स्वप्नील लाटे यांनी त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविण्याचा केलेला प्रयत्न कौतुकास्पद होता. कळंबोली परिसरातील सर्व सामान्य गरीब कुटुंबाचे आरोग्य उत्तम राहावे, त्याचबरोबर अना, अपंग, विशेष कर्णबधिर मुलं, त्याचबरोबर वृधश्रमात जाऊन दिवाळनिमित्ताने मिठाई, तसेच गरजवंताना खेळ, साहित्य व शैक्षणिक साहित्याचे वाटप यावेळी लाटे यांनी केले. सहाय्यक पोलिसांनी कळंबोलीमधील गरीब कुटुंबांची भेट घेतली आणि त्यांच्याशी संवाद साधला.

पोलिसांनी त्यांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या आणि त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. कळंबोलीमधील गरीब कुटुंबांनी पोलिसांच्या या उपक्रमाचे आभार मानले आणि त्यांना धन्यवाद दिले. पोलिसांनी आमच्यासाठी खूप काही केले आहे, आम्ही त्यांचे आभारी आहोत, असे एका गरीब कुटुंबातील सदस्याने सांगितले. स्वप्नील लाटे या सहाय्यक पोलिस निरीक्षकाच्या या उपक्रमाने कळंबोलीमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण केले आहे आणि गरीब कुटुंबांना दिवाळीचा आनंद मिळाला आहे.

# राजेश खन्ना आणि असरानी यांच्या मैत्रीची गोष्ट...









चित्रपटसृष्टीतील मैत्रीच्या नात्याचा रंग काही वेगळाच. राज कपूर आणि राजेंद्रकुमार यांच्यातील मैत्री कायमच चर्चेत असे. मला आठवतंय वांद्रे येथील पाली हिलवरील राजेंद्रकुमारच्या डिंपल बंगल्यातील मिनी थिएटरमध्ये एखाद्या चित्रपटाच्या ट्रायल शोला पाऊल टाकताच राज कपूरची मोठीच फोटो फ्रेम लक्ष वेधून घेत असे...

राजेंद्र कुमार आणि सुनील दत्त यांचीही अशीच घट्ट मैत्री. राजेंद्रकमारचा मुलगा कुमार गौरव याचा विवाह सुनील दत्तची मुलगी नम्रता हिच्याशी झाला आणि ही मैत्री नात्यात बदलली.

रणजित व डॅनी डेन्झोप्पा यांच्यातही छान मैत्री आहे. आजच्या डिजिटल युगात ते एकमेकांना व्हॉट्सअ‍ॅपवर एखादा विनोद वा फोटो पोस्ट करीत असतात आणि दोघांनाही छान रिलीफ मिळतो.

अशा मैत्रीत आणखी एक मैत्री आहे...

ते दिवस वेगळे होते, चित्रपटाच्या सेटवर दिग्दर्शकाने आपले दृश्य ओके म्हणताच त्याच दिग्दर्शकाचा चौथा वा पाचवा सहाय्यक दिग्दर्शक बोलवायला येईपर्यंत आपल्याच विश्वात रममाण होण्याचे नव्हते. आजच्या युगात सांगायचे तर दिग्दर्शक कट असे म्हणताच व्हॅनिटी व्हॅनमध्ये जाऊन व्हॉट्सअ‍ॅप, इन्स्टाग्राम, फेसबुकच्या विश्वात हरवून जाण्याचे नव्हते. आज तेच तर चाललंय. कलाकारांमधील संवाद हरवलाय. मैत्री दूरच. सेटवरच गप्पांची मैफल जमे, लंच ब्रेकमध्ये सेटवर अथवा सेटबाहेर टेबल लागे. मला आठवतंय, वांद्रे येथील मेहबूब स्टुडिओतील जे.ओम प्रकाश दिग्दर्शित आखिर क्यो (१९८५) या चित्रपटाच्या सेटवर आम्हा सिनेपत्रकारांना शूटिंग रिपोर्टिंगसाठी आमंत्रित करण्यात आले होते. सेटवर राजेश खन्ना व असरानी यांच्यात काही महत्त्वाची दृश्य चित्रित करण्यात येत होती. साधारण दोन वाजता तेव्हाचा राजेश खन्नाचा सेक्रेटरी अच्छा आनंद सेटवर आला आणि नजरेनेच खाना रेडी है, असे राजेश खन्नाला कळवताच दिग्दर्शक जे. ओम प्रकाश म्हणाले, चलो खाना खाते है म्हणताच सेटवरील दिवे बंद झाले आणि आम्ही सगळेच मेहबूब स्टुडिओच्या बाहेरील हिरवळीवर आलो.

एका बाजूला आम्ही सिनेपत्रकार, तर दुसरीकडे एका मोठ्या टेबलावर राजेश खन्नाच्या घरून आलेला अनेक प्रकारच्या व चवीच्या शाकाहारी व मांसाहारी पदार्थांची भरपूर रेलचेल असलेला डबा. राजेश खन्नाने सर्वप्रथम एक मोठी प्लेट असरानीला दिली, मग एका मोठ्या ताटात काही पदार्थ आमच्याकडे पाठवले आणि मग स्वतः सॅलड घेतले... त्याचा हा गुण महत्त्वाचा. हे सेटवर भटकंती भेटीगाठी निरीक्षण करीत असलेल्या सिनेपत्रकारांनी अनुभवलाय. असरानीच्या निधनाचे वृत्त समजताच मला हा आठवणीतील क्षण पटकन डोळ्यांसमोर आला.

हिंदी चित्रपटसृष्टीत राजेश खन्नाचे असे जवळचे मित्र कायमच चर्चेत राहिले. संगीतकार राहुल देव बर्मन राजेश खन्नाचा अतिशय खास मित्र. सत्तरच्या दशकात राहुल देव बर्मन अन्य एखाद्या निर्माता, दिग्दर्शक वा नायकाच्या चित्रपटासाठी गीत संगीताच्या सिटींगसाठी बसत असे तेव्हा सुचलेल्या काही अतिशय चांगल्या चाली राजेश खन्नाच्या चित्रपटासाठी बाजूला काढत असे. हा बहुचर्चित किस्सा आहे. किशोरकुमारही राजेश खन्नाचा असाच खास मित्र. म्हणून तर राजेश खन्ना चित्रपट निर्मितीत उतरला असता त्याचा पहिला चित्रपट शक्ती सामंता दिग्दर्शित अलग अलग या चित्रपटातील एक गाणे किशोरकुमार चक्क फुकट गायला. किशोरकुमारच्या लहरीपणाच्या किश्यात हा वेगळाच किस्सा. शक्ती सामंता, रुपेशकुमार, असरानी हे राजेश खन्नाचे आणखी काही जवळचे मित्र.

असरानीच्या मित्रामध्ये एकेकाळी जितेंद्र, ऋषी कपूर, राकेश रोशन आणि रणजित हेदेखील होते. ऐंशीच्या दशकात कधी यातील तिघे, तर कधी चौघे एकाच चित्रपटात हमखास दिसतील. त्या काळात एकमेकांची नावे सुचविली जात. निकोप आणि सशक्त वातावरण होते. त्याच वातावरणात राजेश खन्ना व असरानी यांच्यात संबंध वाढत वाढत गेले आणि व्यावसायिक पातळीवरून व्यक्तीगत नातं निर्माण झालं. त्यातूनच एकमेकांसोबत काम करताना सहजता यैते. दृश्यदेखील खुलते.

**झूम प्रहर**



**दिलीप ठाकूर**
चित्रपट समीक्षक

असरानीने राजेश खन्नाला सर्वप्रथम पाहिले ते आपल्या सुरुवातीच्या संघर्षाच्या काळात. पुणे शहरातील दूरदर्शन व चित्रपट प्रशिक्षण वर्गात पदवी अभ्यासक्रम करीत असतानाच असरानी मुंबईत येऊन एकेका संधीसाठी हिंदी चित्रपटसृष्टीचे दरवाजे ठोठावत होता. अशातच राजेश खन्नाची भूमिका असलेल्या राज खोसला निर्मित व दिग्दर्शित दो रास्ते (१९६९) या चित्रपटाचा दक्षिण मुंबईतील मेट्रो चित्रपटगृहात प्रीमियर होता. त्यांच्या काही आठवड्यांपूर्वीच शक्ती सामंता निर्मित व दिग्दर्शित आराधना (१९६९) प्रदर्शित होऊन सुपरहिट हाऊसफुल्ल गर्दीत सुरू होता. रॉक्सी चित्रपटगृहात आराधना एकदम जोरात सुरू असतानाच पलिकडच्याच फूटपाथवरील ऑपेरा हाऊस चित्रपटगृहात दो रास्ते प्रदर्शित करण्यात व्यावसायिक धाडस होते. याचा प्रीमियर मेट्रो चित्रपटगृहात असताना असरानीने राजेश खन्नाच्या जबरदस्त क्रेझचा अनुभव घेतला. राजेश खन्नाच्या स्वागतासाठी युनायटेड मोशन पिक्चर्सचे नऊ निर्माते दिग्दर्शक राजेश खन्नाच्या स्वागतासाठी मेट्रोच्या प्रवेशद्वारावरच होते. त्यात बी.आर. चोप्रा, जी.पी. सिप्पी, चेतन आनंद, नासिर हुसैन, शक्ती सामंता, जे.ओम प्रकाश, मोहनकुमार, सावनकुमार अशा त्या काळातील बड्या निर्मात्यांचा समावेश होता. असरानीसाठी हा एकूणच अनुभव रोमांचक होता. मेट्रोला राजेश खन्नाच्या असंख्य चाहत्यांचा गराडा पडला होताच आणि त्यात हे बडे निर्माते होते. 'दो रास्ते'चे दिग्दर्शक राज खोसला आणि नायिका मुमताज अगोदरच आले होते. एकूणच उत्साहजनक गर्दीतून वाट काढत काढत पडद्यासमोर पोहचायला राजेश खन्नाला तब्बल चाळीस मिनिटे लागली. हा प्रीमियर खूप गाजला. असरानीच्या मनावर हा अनुभव कायमचा कोरला गेला.

हृषिकेश मुखर्जी दिग्दर्शित 'बावर्ची' (१९७२)मध्ये असरानीला पहिल्यांदा राजेश खन्नासोबत काम करण्याची संधी मिळाली. हृषिकेश मुखर्जी यांच्या गुड्डी (१९७१)मध्ये काम करताना असरानीने हृषिकेश मुखर्जींचा विश्वास संपादन केला होता. चित्रपटसृष्टीतील ही गोष्ट खूप महत्त्वाची. 'बावर्ची'च्या सेटवर दुर्गा खोटे, हरिंद्रनाथ चटोपाध्याय, राजेश खन्ना, उषा किरण, जया भादुरी, ए.के. हनगल असे अनेक तगडे कलाकार होते. असरानी तुलनेत नवखा होता. आता प्रत्यक्ष सेटवर तो राजेश खन्नाच्या वागण्याचा अनुभव घेत होता. असरानीला त्याने फारसे जवळ येवू दिले नाही. या चित्रपटाच्या सेटवर सतत कोणीना कोणी चाहते राजेश खन्नाला भेटायला येत. चित्रीकरण न थांबवता अथवा त्यातून मार्ग काढत काढत राजेश खन्ना त्यांना भेटतोय, त्यांना स्वाक्षरी देतोय, कोणी छोटासा कॅमेरा घेऊन येई, त्यांच्यासोबत फोटो काढत असे. याचा त्यांना भरभरून आनंद मिळत असे हे असरानीने प्रत्यक्षात अनुभवले. राजेश खन्नाचे हे एक प्रकारचे आपल्याला देणे आहे असे असरानी मानत असे.


असरानीला त्यानंतर राजेश खन्नाची भूमिका असलेल्या अनेक चित्रपटांत सातत्याने संधी मिळाली आणि तो राजेश खन्ना व डिंपल यांच्या अगदी निकटवर्तीय झाला. इतका की त्यांच्या थट्टामस्करीतही सहभागी होत असे. चित्रपटाच्या सेटवर एकत्र जेवण करीत असत. एकमेकांची आवडनिवड माहीत झाली होती.

राजेश खन्नाची भूमिका असलेल्या नमक हराम, अजनबी, प्रेम नगर, रोटी, अमरदीप, छैला बाबू, मेहबूबा, धरमकाटा, नौकरी, पल को की छाव मे, बंदीश, अगर तुम न होते, आज का एमएलए रामअवतार, आखिर क्यो, नया कदम इत्यादी चित्रपटांत असरानीची लहान मोठी भूमिका आहे. त्यात रंगत आली ती हृषिकेश मुखर्जी दिग्दर्शित नमक हराम (१९७३) या चित्रपटातील कामगार वस्तीतल्या होळीच्या दिवशी भांग पिणे, हे दोघं आणि इतरांनी (रेखा इत्यादींनी) रंगत आणणे, नदीया से दरीया, दरिया से सागर हे त्याच नशेतील गाणे तसेच आणखी काही सुख दुःखाचे प्रसंग, मै शायर बदनाम मै चला हे गाणं अशा अनेक प्रसंगांत राजेश खन्ना व असरानी एकत्र आहेत. चित्रपटसृष्टीतील काही जमलेल्या जोडीतील ही एक उल्लेखनीय मैत्रीची जोडी.

## मराठी रसिकांचे भावगंधर्व पं. हृदयनाथ मंगेशकर

हृदयनाथ मंगेशकर हे मराठी व हिंदी भावसंगीत तसेच चित्रपटसंगीत यांतील ख्यातनाम संगीतकार व गायक. त्यांचा जन्म २६ ऑक्टोबर १९३७ रोजी प्रख्यात गायकनट मास्टर दीनानाथ मंगेशकर व शुद्धमती उर्फ माई या दाम्पत्यापोटी पुणे येथे झाला. दीनानाथ यांच्या अपत्यांमध्ये हृदयनाथ हे सर्वांत धाकटे (पाचवे) अपत्य. भारतरत्न लता मंगेशकर या आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या गायिका हृदयनाथांच्या सर्वांत ज्येष्ठ भगिनी आहेत तसेच गायिका आशा भोसले, मीना खाडीलकर व उषा मंगेशकर या त्यांच्या इतर भगिनी संगीतक्षेत्रात प्रसिद्ध आहेत.

हृदयनाथांच्या बालपणीच दीनानाथांचे निधन (१९४२) झाल्याने त्यांना वडिलांचा फारसा सहवास व प्रत्यक्ष तालीम मिळाली नाही, पण वंशपरंपरेने आलेला संगीतवारसा, शास्त्रीय संगीताची उस्ताद अमीरखाँ यांच्याकडून घेतलेली तालीम, आपल्या समकालीन



संगीतकारांच्या स्वररचनांचा हृदयनाथांनी केलेला अभ्यास व स्वतंत्र प्रतिभा यामुळे सुरुवातीपासूनच हृदयनाथांची एक वेगळी संगीतशैली आकारास आली. त्यांनी वयाच्या अवघ्या चौदाव्या वर्षी 'निसदिन बरसात नैन हमारे' व 'बरसे बुंदिया सावन की' या भक्तिगीतांना स्वरसाज चढविला.

संगीतकार सलील चौधरी यांना गुरूस्थानी मानणाऱ्या हृदयनाथांना त्या वेळच्या बहुतेक सर्व महत्त्वाच्या संगीतकारांचा सहवास व काहींची मैत्री लाभली. त्यामुळे त्यांची मुळचीच वेगळी संगीतशैली अधिक विकसित व वैविध्यपूर्ण होत गेली. या शैलीमध्ये भारतीय शास्त्रीय संगीत, लोकसंगीत तसेच पाश्चिमात्य संगीत यांचा मिलाफ होतो. या शैलीने विशेषत: भावसंगीताच्या परंपरेला एक सुरेल छेद देऊन, रसिकांसमोर सुरांचे, लयीचे व भावांचे एक वेगळे प्रकटीकरण सिद्ध केले. कशी काळ नागिणी, चांदणे शिंपीत जाशी, तिन्हीसांजा सखे मिळाल्या, दे मला गे चंद्रिके, येरे घना, जिवलगा राहिले दूर घर माझे, घनतमीं शुक्र राज्य करी, माझे गाणे, ही वाट दूर जाते अशी कित्येक गीते याचे उदाहरण म्हणून सांगता येतील.

हृदयनाथांनी आपल्या विस्तृत संगीत अवकाशामध्ये संत ज्ञानेश्वर, मीराबाई, सूरदास, कबीर आदी संतकवींबरोबरच भा.रा. तांबे, गोविंदाग्रज, स्वा. सावरकर आदी स्वातंत्र्यपूर्व काळातील कवी तसेच आरती प्रभू, सुरेश भट, ग्रेस, शांता शेळके, ना.धों. महानोर आदी स्वातंत्र्योत्तर आधुनिक कवी यांच्या विविध रचनांचा समावेश केला. या सर्वांच्या रचनांमधील वैविध्य व विभिन्न भाव समर्थतेने रसिकांपर्यंत पोहोचवले, हे त्यांच्या संगीत-कारकिर्दीतील मोठे यश व सुगम संगीतक्षेत्राला त्यांच्याकडून मिळालेले मोठे योगदान होय. अशा सर्व कवींच्या काव्यातील शब्दांपलीकडचे अमूर्त भाव वेगळ्या सांगीतिक हाताळणीसह स्पंदनशील व श्रुतिप्रधान संगीतरचनांमधून अभिव्यक्त करणे हे त्यांच्या संगीताचे मोठे वैशिष्ट्य आहे.

हृदयनाथांना अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. त्यामध्ये लेकिन या हिंदी चित्रपटाच्या संगीत दिग्दर्शनासाठी राष्ट्रीय पुरस्कार (१९९०), पं. भीमसेन जोशी व पं. जसराज यांच्या हस्ते 'पंडित' ही पदवी, शंकराचार्यांकडून 'भावगंधर्व' ही पदवी, शासनाकडून 'पद्मश्री' पुरस्कार (२००९), सूरसिंगार हे पारितोषिक यांचा समावेश आहे. (साभार : इंटरनेट)

## स्वातंत्र्यसैनिक, लेखक आणि पत्रकार अनंत भालेराव

अनंत काशिनाथ भालेराव हे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील स्वातंत्र्यसैनिक आणि लेखक, संपादक होते. हैदराबाद मुक्तिसंग्राम लढ्यात महत्त्वाची भूमिका बजावल्यानंतर अनंतरावांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील सत्याग्रहातही सहभाग घेतला. याबद्दल सक्तमजुरीच्या आणि तुरुंगावासाच्या शिक्षाही भोगल्या. स्वातंत्र्योत्तर काळात औरंगाबादहून प्रसिद्ध होत असलेल्या दैनिक मराठवाडातून त्यांनी सातत्याने समाजहिताची, विकासाची भूमिका घेत लेखन केले.

अनंतराव भालेराव यांचा जन्म १४ नोव्हेंबर १९१९ रोजी वैजापूर तालुक्यातील खंडाळा येथे झाला. त्यांचे वडील काशिनाथराव वारकरी होते. त्यामुळे बालपणापासूनच अनंतरावांच्या



व्यक्तिमत्त्वावर वारकरी संप्रदायाचा आणि ज्ञानेश्वर-तुकारामांच्या साहित्याचा संस्कार झाला.

अनंतरावांनी मॅट्रिकनंतर १९३८मध्ये सत्याग्रह सुरू केला. १९४२मध्ये चले जाव आंदोलन सुरू झाल्यानंतर १९४४मध्ये शिक्षकी पेशा सोडून कार्यकर्ता म्हणून अनंतरावांनी पूर्णवेळ काम केले. १९४७पर्यंत त्यांनी स्वातंत्र्यलढ्यात महत्त्वाची भूमिका बजावली. अनंतरावांनी हैदराबादच्या स्वातंत्र्य संग्रामाचा इतिहास लिहिला आहे. स्वातंत्र्यलढ्याचे सेनानी स्वामी रामानंद तीर्थ यांचे चरित्रही लिहून प्रकाशित केले.

कॅनडा दौऱ्यावरील 'पळस गेला कोकणा' हे प्रवासवर्णन, मराठवाडा वृत्तपत्रातून लिहिलेल्या अग्रलेखांचा संग्रह 'आलो याची कारणासी' आणि हैदराबाद मुक्तिलढ्यातील आठवणींचा संग्रह 'पेटलेले दिवस' ही दोन्ही पुस्तके, 'कावड' यात सहवासातील व्यक्तींची व्यक्तिचित्रे लिहिली आहेत. १९७८ साली अनंतरावांचा फाय फाऊंडेशनचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. वृत्तपत्रसृष्टीतील अत्यंत उल्लेखनीय योगदानाबद्दल त्यांना बी.डी. गोएंका पारितोषिक १९८८मध्ये देण्यात आले. अशा या लेखकाचे २६ ऑक्टोबर १९९१ रोजी निधन झाले. (साभार : इंटरनेट)

## कजेर

कोकणातील समुद्र किनारी कजेर आढळते. विशेषतः समुद्राला उधाणी भरती आली की चार तासांच्या अंतराने ओहोटी आणि भरतीच्या लाटांसमवेत किनारी आलेला जो काट्याकुट्यांनी रचलेला समुद्री कचऱ्याचा ढीग दिसतो, त्यास कोकणातील लोक विशेषकरून किनारी राहणारे रहिवासी त्यास 'कजेर' असे बोलतात.

महिन्यातून दोन वेळा हा कचरा मोठ्या प्रमाणात हमखास किनारी येतोच येतो. त्याचा ढीग साचलेला अधूनमधून दिसतोच, कारण अमावस्या आणि पौर्णिमेला पूर्ण दर्याभरती असते. उधाणाचा जोर तसा कधी जास्त कधी कमी असू शकतो. जेव्हा समुद्र शांत असतो (दिसतो) तेव्हा वरवर जरी लाटांचा उफाळ कमी असला तरी पाण्याचा फैलाव वाढतो. त्यास ग्रामीण बोलीत पाण्याचा करंट असे म्हणतात. त्यामुळे भरतीच्या लाटांनी किनारी वाहून आलेला कचरा हा कुठे ना कुठेतरी पुळणीत ढकलून देण्याचे काम या एरव्ही शांत दिसणाऱ्या लाटा सहज करून जातात. कोकणात यास खोचक बोलीत एक मस्त म्हण आहे..

'इधर की उखली उधर को ढकली...
मी बाय मोकळी के मोकळी...!'

अमावस्येला सुर्यास्त होताना समुद्र बराचसा बाहेर गेलेला दिसतो. लकाकणारी पुळण सूर्यप्रकाशात मुक्त श्वास घेत असते. तेव्हा जर किनाऱ्यावर पायी चालत गेलो की समुद्रातील दडलेली अनेक देखणी शिल्पं पुळणीत (समुद्री मातीला पुळण म्हणतात) अर्धी चिकटून दिसतात. एरवी हौशी लोकांचा हा विरंगुळा असतो, पोफळीच्या (सुपारी) विरितून ती शिल्पं गोळा केली जातात. शिवाय ओल्या पुळणीवर काही तरुण जोडपी आपापली नावे लिहितात. नक्षीकाम करतात. अगदीच लाडावलेली प्रेयसी आपल्या प्रेमीला विचारते... हे रेतीत कोरलेलं माझं नाव कितीकाळ टिकणार? प्रेमी हसतो व लगेच आठवलेला उर्दू शेर चिकटवतो... रेत पे लिखा नाम भला कबतक टीका है...? हे ऐकताच खोलवर गेलेल्या समुद्रापर्यंत आपली दृष्टी नेत प्रेमिका कसल्यातरी भावनिक विचारात डूबुन जाते. इथवर समुद्राने स्वच्छ धुवून ठेवलेल्या पुळणीत अनवाणी चालताना मन खरंच खूप रमतं, वेळ मजेत जाते, पण जसजसे आपण वाळलेल्या पुळणीकडे



येऊ लागतो तसतसा समुद्री कचऱ्याचा तो ढीग पुळणीत अर्धवटच गाडला गेलेला दिसतो. बारीक निरीक्षण केल्यास त्यामध्ये प्रामुख्याने दिसतात त्या बारीक पण टणक अशा काठ्या... (ग्रामीण बोलीत काटक्या) खाजण रानातील खारफुटीची गळून पडलेली फांदी शेवटी लाटेसमवेत किनारा गाठतेच. त्यातच मच्छीमारांनी बोटीतून टाकून दिलेली फाटकी जाळं असतात. त्याशिवाय काचेच्या बाटल्या, नको असलेला प्लस्टिकचा जमावडा, इस्पितळात वापरून झालेल्या निकामी सलाईनच्या पिशव्या, फायबरचे गुच, रबरी चपला आणि असं बरंच काही असतं, ज्यास कचरा समजून जलसमाधी दिली जाते, पण समुद्र आपल्या गर्भात काहीच ठेवत नाही. सव्याज किनारी नेऊन ठवतो. त्यातच वाहून आलेल्या लाकडी फळ्या, कड्या, नारळी सोळणी आणि प्रत्यक्षात नारळ ही वाहून त्या ढिगाऱ्यात जाऊन दडलेले असतात. दारूच्या रिकाम्या बाटल्यांचा तर खच पडलेला असतो.

एकदा तर चक्क नवीन चपलांचा खच किनारी लागला होता. अनेकांनी तो उचलून आपल्याला होतो का ते पाहण्याचा प्रयत्न केला, पण दुर्दैवाने सर्व चपला एकाच पायाच्या निघाल्या. आणि फॉरेनच्या हवाई चपला साऱ्यानांच चक्क लल्लू करून गेल्या. कजेर तशी दोन प्रकारची असते. हे पुस्तकी ज्ञान नव्हे तर प्रत्यक्षात पाहिलेलं, अनुभवलेलं आहे. पावसाळ्यात दोन ते तीन वेळा नदीला आऊर (पूर) येतोच. डोंगराळ उतारावरून येणाऱ्या पाण्यासमवेत रानातला कचराही वाहून येतो. ती कजेर येऊन पुळणीत अडकली की त्याचा अन्न शिजवण्यास चांगला उपयोग होतो, पण मान्सूनव्यतिरिक्त किनाऱ्यावर वाहून आलेली कजेर ही खारट असते. कालांतराने त्यावर साचलेलं मीठही दिसते. त्या कजेरीचा उपयोग गारव्यात शेकोटी पेटविण्यासाठी म्हणून केला जातो. घराशेजारील मच्छर पळवण्यासाठी म्हणूनही या कजेरीचा उपयोग होतो, ज्यामध्ये चिमुटभर लोबाण टाकल्यास परिसर सुगंधित होतो.

असंच एकदा किनारी पुळणीत नेहमीप्रमाणे एकटाच बसलो होतो. तासाभरात तिन्हीसांजेची वेळ होणार म्हणून पाण्यात जावं का? याच विचारात होतो की अचानकपणे गावातीलच एक व्यक्ती खांद्यावर सिमेंटच्या बोरीत काहीतरी घेऊन येताना दिसली. थकल्यामुळे कदाचित माझ्याच समोर येऊन बसली. हनिफ बाबा त्याचे नाव. माणूस मोलमजुरी करून कौटूंबिक गाडा चालवणारा. जफाकश माणूस. फुकटची चौकशी करण्यात काय उपयोग? इतक्यात तोच बोलू लागला...

तुला ठावं हाय, बोरित काय हाय? ओळख पाहू... मी हसलो. कामावरचे कपडे, मळकट दाढी, समोरचे दंतफाटक पार मोकळे झालेले. धड त्यास हसता ही येईना. शब्दांना आकार देत बोलता ही येईना. माझ्याकडे बघता-बघता तो बोरीतून एक-एक वस्तू बाहेर काढून दाखवू लागला. इंपोर्टेड दारूच्या/बिअरच्या देखण्या बाटल्या, घरगुती प्लास्टिकच्या अनेक अशा टाकाऊ वस्तू, फायबरच्या टाकाऊ वस्तू, अ‍ॅल्यूमिनियमची नासलेली भांडी. असा बराचसा ओळखीचा 'खजिना' त्याने काढून दाखवला. ते सगळं पाहून मला सुचेना, मी प्रतिक्रिया काय द्यावी. तरीही त्यास अगदीच वाईट वाटू नये म्हणून सहजपणे विचारले. हे घरी नेऊन तू काय करणार? हीच तर गंमत आहे. माझी जगण्याची पद्धत फार वेगळी आहे. अशा अनेक टाकाऊ वस्तु मला कजेरित सापडतात. शोधल्याशिवाय नाही कळणार काय आहे त्या कचऱ्यात. अशा मौलिक वस्तू महिन्याभरात गोळा करून थेट भंगारवाल्यास विकणार. त्या पैश्यातून माझं महिन्याचे वीजबिल भरून टाकतो... ही आहे माझी जगण्याची पद्धत. कशी वाटली?

हनिफ बाबा हा मोलमजुरी करून कौटूंबिक प्रपंच चालवणारा अवलिया खरंच डोकॅलीटी वापरून वीजबिल भरण्याचे जबाबदारीचे काम तो अशा मेहनतीने पूर्ण करत होता. शिवाय कजेरसुद्धा तो उचलून घरच्या आवश्यात घेऊन जायचा, ज्यामुळे घरातील इंधनाची बचत तो करत होता. शिवाय उधाणामुळे किनारी आलेला कचराही स्वच्छ करत होता.

महागडी पुस्तकं, शैक्षणिक क्रॅश कोर्सेस, नानाविध जगण्याच्या अनेक कला सर्वांना जमत असतील, पण ग्रामीण भागातील जिद्दी लोकांकडून बरंच काही शिकता येतं, जे पुस्तकांत लिहिलेलं नसेल, क्रॅश कोर्सच्या सिलॅबसमध्ये तर निश्चित नसेल. जगणं एक कला आहे. टाकाऊतून टिकाऊ ही कला सगळ्यांनाच जमते असं नाही, पण ज्याला जमते त्याचे गुणगान झाले पाहिजे.

**-इक्बाल शर्फ मुकादम, दापोली**

# तळाशेतमध्ये भाजपची ताकद वाढली

## काकळ गौळवाडी ग्रामस्थांनी हाती घेतले 'कमळ'



**माणगाव : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाचे युवा नेते निलेश थोरे यांच्या नेतृत्वामध्ये भाजपने तळाशेत जिल्हा परिषद मतदारसंघामध्ये जोरदार बांधणी केली असून २४ ऑक्टोबर रोजी साई पंचायत समिती गणातील काकळ गौळवाडी या संपूर्ण गावाने गावकमिटीचे अध्यक्ष व साई विभागातील जेष्ठ कार्यकर्ते किसन महाडिक यांच्या नेतृत्वामध्ये भाजपा दक्षिण रायगड कार्यालय अलिबाग येथे जाहीर पक्षप्रवेश केला,विशेष म्हणजे एकमुखी निर्णय घेऊन सर्वच्या सर्व ग्रामस्थांनी पूर्ण गावाचा पक्षप्रवेश घेतला.

काकळ गौळवाडीचे भारतीय जनता पक्षामध्ये रायगड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष अॅड. आस्वाद पाटील, जिल्हा सरचिटणीस अॅड. महेश मोहिते, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष सौ.चित्राताई पाटील, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष निलेशजी थोरे, माणगाव तालुकाध्यक्ष परेशजी सांगले, महिला तालुकाध्यक्षा रचना थोरे, तालुका उपाध्यक्ष सुधीरजी म्हामुणकर, संतोषजी कळंबे यांनी भारतीय जनता पक्षामध्ये पक्षप्रवेश घेऊन स्वागत घेतले.

या वेळी गांव कमिटी अध्यक्ष किसन महाडिक यांच्यासमवेत विद्यमान ग्रामपंचायत सदस्य गजानन रिकामे, मुंबईकर मंडळाचे अध्यक्ष नामदेव बाटे, गावाकमिटीचे सचिव सुनील महाडिक, खजिनदार दगडू महाडिक, मुंबईकर मंडळाचे उपाध्यक्ष मुकेश रिकामे, सेक्रेटरी अशोक जाळगावकर, उपसेक्रेटरी विलास महाडिक, खजिनदार विनायक महाडिक, उपखजिनदार संदीप महाडिक यांच्यासमवेत अनंत महाडिक, सौरभ महाडिक, निखिल महाडिक, सुरेश नटे, निखिल रिकामे, संतोष महाडिक, आकाश महाडिक, वसंत महाडिक, अमोल बाटे, अनिकेत बाटे, अशोक रिकामे, तुषार बाटे, रिद्धेश महाडिक, अनिल महाडिक, अरविंद महाडिक, ऋषभ महाडिक, रामजी महाडिक, अक्षय महाडिक, ह्रतिक महाडिक, अल्पेश महाडिक, केतन महाडिक, निखिल महाडिक, वसंत महाडिक, दिलीप महाडिक, भारत महाडिक,अंकुश रिकामे,गणपत महाडिक, सचिन महाडिक, ओमकार महाडिक यांनी जाहीर पक्षप्रवेश केला.

या वेळी अॅड. महेश मोहिते यांनी उपास्थितांना मार्गदर्शन केले, या वेळी किसन महाडिक यांनी सांगितले की, युवानेते निलेश थोरे यांच्यासारखा रात्री अपरात्री सामान्य माणसांना स्थानिक पातळीवर धावून जाणारा व प्रशासनाची जाण असणारा कार्यकर्ता आपल्या भागामध्ये त्यांच्या पत्नी रचना थोरे यांना येत्या निवडणुकीच्या रिंगणात उतरवत असल्याने त्यांचे हात बळकट करण्यासाठी व केंद्राच्या, राज्याच्या योजना आणि विकास आमच्या गावातील नागरिकांपर्यंत पोहचवण्यासाठी आम्ही भारतीय जनता पक्षात प्रवेश करत आहोत.

दरम्यान, या पक्षप्रवेशामुळे या विभागात व मतदारसंघात भाजपाला आणखी ताकद मिळाली असून मतदार संघात भाजपाचे वारे जोरदार वाहत असल्याचे स्पष्ट होत आहे. या कार्यक्रमासाठी अलिबाग तालुकाध्यक्ष रोशन भगत, अशोक वारगे, चेतन पाटील यांच्यासमवेत महादेव कदम, नयन पोटले, साईनाथ पेणकर, अमोल पवार, सरचिटणीस बाबुराव चव्हाण, अनिल दांडेकर यांनी विशेष मेहनत घेतली.

## शेतीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसानभरपाई द्या –किशोर म्हात्रे

**नागोठणे : बातमीदार**

रायगड जिल्हा हा भाताचा कोठार समजला जात असताना जिल्ह्यातील शेतकऱ्यांना अवेळी पडलेल्या मुसळधार पावसामुळे मोठा फटका बसला असून भात शेती पूर्णतः उध्वस्त झालेली आहे त्यामुळे रायगड जिल्हाधिकारी यांनी शेतीचे पंचनामे करण्यासाठी जिल्ह्यातील तहसिलदारांना आदेश देऊन शेतकऱ्यांना लवकरात लवकर नुकसान भरपाई मिळवून देऊन दिलासा द्यावा, अशी मागणी भाजप नेते किशोर म्हात्रे यांनी प्रसिद्धी पत्रकामार्फत केली आहे.

किशोर म्हात्रे प्रसिद्धी पत्रकात म्हणतात की, ६ मे २०२५ पासून पावसाने सुरुवात केली ती आजतागायत म्हणजे ऑक्टोबर महिना संपत आला असला तरी पाऊस जाण्याचे लक्षण दिसत नाही. या अवेळी व दिर्घकाळ पडत असलेल्या या पावसाने शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घासही हिरावून घेतलेला आहे. आता शेतात बारा महीने राबूनही आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करु शकणार नाहीत अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. कोकणातील लोकांचे मुख्य अन्न भात आहे आणि भातच खायला नसेल तर खाणार काय ? शेतीचे काम करण्यासाठी शेतकऱ्यांनी रोजंदारीवर खर्च केलेली मजुरांची मजुरी सुद्धा सुटणार नाही. एक तर शेतकऱ्यांच्या भाताला कवडीमोल भाव दिला जातो. त्यात पावसामुळे भिजलेल्या भाताला दुकानदार भाव तरी काय देणार? आणि शेतकरी त्यांच्या कुटुंबियांचे पोट तरी कसे भरणार.

यावर्षी बेफाम पडणाऱ्या पावसामुळे शेतकरी देशोधडीला लागलेले आहेत. शेतकऱ्यांच्या शेताची पाहाणी केल्यास सर्व शेतातील भात कोलमडून जमिनीवर पडलेला आहे. त्यासाठी रायगड जिल्हाधिकारी यांनी तत्काळ शेतीचे पंचनामे करण्यासाठी जिल्हातील तहसीलदार यांना आदेश करावेत व लवकरात लवकर नुकसान भरपाई मिळवून द्यावी, अशी मागणी किशोर म्हात्रे यांनी केली आहे.

# आदिवासी मुलांना दिवाळी फराळ, शैक्षणिक साहित्य वाटप

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार जगदीश हरिचंद्र दगडे यांनी यंदाही दिवाळीच्या निमित्ताने आदिवासी समाजातील लहान मुलांसाठी दिवाळी फराळ व शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रमाचे आयोजन केले. हा उपक्रम दगडे खानावळ येथे सातत्याने गेली सात वर्षे राबवला जात असून, समाजसेवेसाठी निस्वार्थी वृत्तीने काम करणाऱ्या जगदीश दगडे यांच्या कार्याचे सर्वत्र कौतुक होताना दिसत आहे. अॅड. कैलास मोरे यांच्या नेतृत्वाखाली हा कार्यक्रम सामाजिक एकतेचा आणि शिक्षणप्रेमाचा संदेश देणारा ठरला.



कार्यक्रमात आदिवासी कार्यकर्ते सोमनाथ वाघमारे यांनी आपल्या कातकरी बोलीत समाजाला शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले, तर सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल वरोटे यांनी स्वतःचा प्रवास सांगत मुलांना प्रेरित केले –मीही सामान्य कुटुंबातून MPSC परीक्षा देऊन अधिकारी झालो, तुम्हीही अभ्यास करा आणि अधिकारी बना, असे सांगितले.

रून शिक्षणाने आपला समाज सक्षम करा. या कार्यक्रमाला सामाजिक कार्यकर्ते संदीप बोराडे, पोलिस पाटील नरेश तुपे, पत्रकार कैलास म्हामले, पत्रकार रोशन दगडे, मंगेश देशमुख, प्रशांत दगडे तसेच अनेक मान्यवर उपस्थित होते. या उपक्रमामुळे आदिवासी वाडीतील मुलांची दिवाळी अधिक आनंदमय झाली असून, शिक्षणाची गोडी निर्माण करणारा हा सामाजिक उपक्रम स्थानिकांमध्ये चर्चेचा विषय ठरला आहे.

# क्रूझ करिअर शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**माथेरान : प्रतिनिधी**

शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर दहावी बारावीनंतरच्या काळात कुटुंबाला आधार देण्यासाठी युवा पिढी कुणी नोकरीच्या मागे लागतात तर कुणी व्यवसाय निवडताना दिसतात, परंतु आपल्या कलागुणांना वाव देण्यासाठी आणि विशेष म्हणजे कमी वेळात अधिक पैसा कामविण्याचे उत्तम साधन म्हणजे क्रूझ करिअर असल्याचे मत माजी नगराध्यक्ष मनोज खेडकर यांनी व्यक्त केले.





माथेरान तसेच इतर ठिकाणाहून आलेल्या युवकांसाठी क्रूझ करिअर शिबिराचे आयोजन खेडकर यांनी हॉटेल सन अँड शेड इथे केले होते त्यावेळी ते बोलत होते. या वेळी व्यासपीठावर क्रूझमध्ये कार्यरत असणारी मुले प्रमुख अतिथी म्हणून प्रवीण जोशीलकर, अभिराज मेडगे, महेश तुपे, भूषण सावंत, नईम खान, विशाल इंगळे, संदेश पाटील हे स्थानापन्न झाले होते. शिक्षक सुनील शिंदे, माजी नगरसेवक शिवाजी शिंदे, उद्योजक नितीन शहा, संदीप शिंदे यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. खेडकर पुढे म्हणाले की, हॉटेल मॅनेजमेंट कोर्स पूर्ण झाल्यावर क्रूझवर चांगल्या पगाराचे काम मिळत असून देशविदेशात याच माध्यमातून भटकंतीसुध्दा होते. दरम्हा लाखोंची कमाई आणि जगभर प्रवास हे युवकांना अल्पावधीतच मिळत असते.

या क्रूझमधील कामामुळे या युवकांकडून त्यांच्या कुटुंबाला मोठा आधार मिळत आहे. माथेरानमधून तिघेजण या क्षेत्रात कार्यरत असून त्यानांही या गावातील सुशिक्षित बेरोजगार युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी त्यांनी हे शिबीर आयोजित करण्यासाठी परिश्रम घेतले. क्रूझवरील कामामुळे अल्पावधीतच लाखोंची कमाई होत असून या माध्यमातून जगभर प्रवास करण्याची नामी संधी उपलब्ध होत असते.

या वेळी गावातील काही युवक–युवती; त्याचप्रमाणे राज्यातील विविध भागांतील युवकांनी आवर्जून या शिबिरासाठी हजेरी लावली.राधा खेडकर, शिक्षक योगेश जाधव यांनी या वेळी आपले अनमोल विचार व्यक्त केले. त्याचबरोबर उपस्थित क्रूझमधील प्रमुख पाहुण्यांनी उत्तम मार्गदर्शन करून या क्रूझ कामातून कशा प्रकारे अधिकाधिक उत्पन्न मिळते याची संपूर्ण माहिती दिली.

## अवकाळी पावसामुळे मानकुळे परिसरातील भातशेती धोक्यात



**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

अलिबाग तालुक्यातील खारेपाट विभागास बहिरीचा पाडा मानकोळे नारंगीचा टेप बंगला बंदर परिसर आदि परिसरातील शेतकरी वर्गाने कापणी केलेल्या भात शेतीला अचानक पडलेल्या अवेळी वाऱ्या पावसाने भात शेती धोक्यात आली आहे. परिणामी शेतकरी वर्गाचे मोठे नुकसान झाले आहे याची कृषी विभाग जिल्हा प्रशासन यांनी तात्काळ दखल घेऊन नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत तातडीने द्यावी अशी येथील शेतकरी वर्गाकडून जोरदार मागणी होत आहे.

# कर्जतमधील बैलाच्या हल्ल्यामागील कारणांची चौकशी व्हावी; अॅड. जोशींची मागणी

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत शहरात झालेली घटना दुर्दैवी आहे, मात्र जर हा बैल तस्करांमुळे पिसाळला असेल तर त्याचे जबाबदार गो तस्करांना धरायला हवे. त्यांच्यावर खुनाचा गुन्हा दाखल करायला हवा. पोलीस तपास करतील, अशी अपेक्षा आहे. बैलाला रेबीज झालं असेल हा निकष कोणी काढला आहे? असा आरोप वकील ऋषीकेश जोशी यांनी केला आहे.

कर्जत येथे ऐन दिवाळी सण साजरा होत असताना कर्जत शहरात पिसाळलेल्या एका बैलाने एकाचा बळी घेतला तर पाच जणांना जखमी केले आहे. त्या पिसाळलेल्या बैलाना पकडण्यासाठी रेस्क्यू टीम तैनात करावी लागली. त्यानंतर पकडण्यात आलेल्या बैलाला जेसीबीमध्ये भरून डंपिंग ग्राउंडवर नेले होते. त्यावेळी नीट हाताळता न आल्याने हा बैल मृत पावला की भूल दिल्याने हा मृत पावला? हा एक वेगळा विषय आहे. प्राथमिक अंदाज असा आहे की ज्यावेळी बैलाला तस्कर भुलीच इंजेक्शन देतात व त्याला पकडून नेतात ते शक्य होत नसेल तर तो चिडतो. तो काहीही करू शकतो. त्याचे साथीदार पकडून नेले असावेत आणि या बैलाला राग आला असावा. पोलिसांनी याबाबत स्पष्टीकरण द्यावे, अशी मागणी अॅड. जोशी यांनी केली आहे.



बैलाला तस्कर पकडायला आले असतील व त्यामुळे तो चिडला असेल तर तस्करांवर खुनाचा गुन्हा दाखल करण्यात यावा आणि बैलाची बॉडी कुठे आहे हे वैद्यकीय अधिकारी, पोलीस आणि पशु वैद्यकीय अधिकारी यांनी सांगावे. बैलाच्या मृत्यूपेक्षा ज्या व्यक्तीचा मृत्यू झाला ते महत्त्वाचे आहे. भविष्यात असे प्रकार परत होऊ नयेत यासाठी हे गरजेचे आहे. कारण एकूण सर्वच भूमिका संशयास्पद असल्याचा दावा अॅड. हृषीकेश जोशी यांनी केला आहे.


## जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे मोहोपे, तहसील– पनवेल, जिल्हा– रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार श्रीमती लता हरीभाऊ पवार यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे::

**शेतजमीनीचे वर्णन**

**मौजे मोहोपे, तहसील पनवेल जिल्हा रायगड येथील मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील,**

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | क्षेत्र | | | आकार |
|---|---|---|---|---|---|
| | | लावणी लायक | पोटखराबा | एकुण क्षेत्र | |
| | | हे. आर. प्रती | हे.आर.प्रती | हे.आर.प्रती | रू. पै |
| ८४/४/अ | २ | ०–६६–६० | ०–१५–२० | ०–८१–८० पैकी ०–४०–०० | ७.५२ |

वरील शेतजमीन/मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन १५ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक : २५/१०/२०२५**

**कार्यालयीन पत्ता**
**शॉप नं. १५४, पनवेल महानगरपालिका कॉम्पलेक्स तहसिदार ऑफिस जवळ, दत्त झेरॉक्सच्या वरती, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६**

**सही/–**
**अॅड. स्वप्निल व्यं जाधव**
**बी.ए.एल.एल.बी.**
**( खरेदीदारचे वकिल)**


# दहिवलीत शिवमल्हार गटाने साकारली लोहगडाची प्रतिकृती

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत नगर परिषद हद्दीतील दहिवली येथील शिवमल्हार गटाने ह्यावर्षी लोहगडाची भव्य प्रतिकृती तयार केली असून ती पाहायला गर्दी होत आहे. ह्यावर्षी शिवमल्हार गटाचे तिसरे वर्ष आहे.

सन २०२३ मध्ये प्रतापगड, सन २०२४ मध्ये राजगड आणि ह्यावर्षी २१ ८ फूट परिसरात भव्य असा लोहगड किल्ला जसाच्या तसा तयार करण्यात त्यांना यश आले आहे. हा गड बनवण्यासाठी फक्त नैसर्गिक घटकांचा वापर केला असून कुठेही प्लास्टिक अथवा सिमेंटचा वापर केलेला नाही, असे शिवमल्हार गटाची प्रमुख नेत्रा कनोजे यांनी सांगितले.

शिवमल्हार गटाचे संस्थापक सागर सुर्वे ह्यांनी ह्या गटाची स्थापना सन २०२३ मध्ये केली आणि ऐतिहासिक संस्कृती टिकावी म्हणून सर्व लहानग्यांना एकत्र करून किल्ल्याचे महत्त्व पटवून दिले. आज हा भव्यदिव्य किल्ला पाहायला अनेक जण येत आहेत व सर्व जण कौतुक करत आहेत. येणाऱ्या प्रत्येक पर्यटकांना लोहगडाची सविस्तर माहिती सांगून इतिहासाचे महत्त्व शिवमल्हार गट पटवून सांगत आहेत.



हा गड बनवण्यासाठी तब्बल १८ दिवस लागले शेतातील माती आणि मोठे दगड गटातील सभासदांनी स्वतःहून वाहून आणले आहेत. त्यासाठी नेत्रा कनोजे, लावण्या कनोजे, ईशांत मालुसरे, ओमकार कनोजे, वेदांत सुपे, सार्थक गुरव, युगान सुर्वे, भव्य सुर्वे, गौरव मूर्ती, यज्ञेश कनोजे आणि तन्वी कनोजे हे कार्यरत होते. ह्या गडाचे महत्त्व सांगताना गटाचे आतापर्यंतचे उपक्रम गटाच्या अध्यक्षा लावण्या कनोजे पर्यटकांना सांगत आहेत. ह्या गटामध्ये वयवर्षे १० ते १८ वर्षांचे सभासद असून त्यांच्या प्रत्येक उपक्रमाची चर्चा गावामध्ये कौतुकाचा विषय होत आहे.

छत्रपतींसाठी संवर्धन व्हावे म्हणून भविष्यात सांस्कृतिक उपक्रम आम्ही राबवणार आहोत जेणे करून येणाऱ्या पिढीला इतिहासाचे महत्त्व पटेल आणि दिवाळीत किल्ला बनवण्याची प्रथा सुरू राहील ह्यासाठी आम्ही कार्यरत आहोत, असे अध्यक्षांनी सांगितले. जास्तीत जास्त लोकांना हा गड पाहता यावा म्हणून लोहगड प्रतिकृती आम्ही दिनांक १० नोव्हेंबर पर्यंत ठेवणार असून दहिवलीमधील गुरव आळीतील प्रभू छाया सोसायटीमध्ये गणेश कनोजे ह्यांच्या अंगणात भेट द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## 'दिवाळी पहाट'ने नेरळकर मंत्रमुग्ध

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यात दिवाळी साजरी होत असताना नेरळ मध्ये स्वरानुभूती निर्मित आयोजित दिवाळी पहाट आयोजन केले होते. नेरळ ग्रामस्थांनी मोठ्या प्रमाणात या दिवाळी पहाट कार्यक्रमाला मोठी गर्दी केली. गायकांनी सादर केलेल्या गीतांनी नेरळकर मंत्रमुग्ध झाले.

कुसुमेश्वर देवस्थानच्या प्रांगणात दिवाळी पहाटचे आयोजन करण्यात आले होते. या मैफिलीची प्राप्ती दहीवलीकर, जान्हवी दहीवलीकर या भगिनींनी ओम नमो जी आद्या या गीताने छान सुरुवात केली.या नंतर राम कृष्ण हरी... च्या गजरात सर्व तल्लीन झाले. अक्षय जोशी याने तू सुखकर्ता हे गीत सादर केले.

या नंतर बाप्पा थोडे थांबाना..., बोलावा विठ्ठल... , संतांचिया गावी प्रेमाचा सुकाळ... राम रंगी रंगले... तुझे नाम आले ओठी... सोहम हर डमरू... तेजोनिधी लोहगोल... कानडा राजा पंढरीचा... दत्ताची पालखी... सुखाचे सुख चंद्रभागे तटी... शब्दा वाचून कळले सारे... आली माझ्या घरी ही दिवाळी... असे अवीट गोडीचे अभंग तसेच एकापेक्षा एक सरस गाणी सादर करून या त्रयींनी रसिक प्रेक्षकांना अक्षरशः खिळवून ठेवले.

रितीकेश दळवी, तनय कामत, राकेश पवार आणि कार्यक्रमाचे संगीत संयोजक विवेक दहीवलीकर यांची उत्तम साथ आणि नम्रता खैरनार यांचे खुमासदार निवेदन याने हा कार्यक्रम उत्तरोत्तर रंगत गेला.




## जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे मोहोपे, तहसील– पनवेल, जिल्हा रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार श्री सागर यशवंत कर्वे व श्रीमती उमा महेश ठाकुरदेसाई, यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे:–

**शेतजमीनीचे वर्णन**

**मौजे मोहोपे, तहसील पनवेल जिल्हा रायगड येथील मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील,**

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | क्षेत्र | | | आकार |
|---|---|---|---|---|---|
| | | लावणी लायक | पोटखराबा | एकुण क्षेत्र | |
| | | हे. आर. प्रती | हे.आर.प्रती | हे.आर.प्रती | रू. पै |
| १०७/२ | १ | ०–२१–३० | ०–१३–१० | ०–३४–४० | ०.३७ |

वरील शेतजमीन/मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन १५ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक : २५/१०/२०२५**

**कार्यालयीन पत्ता**
**शॉप नं. १५४, पनवेल महानगरपालिका कॉम्पलेक्स तहसिदार ऑफिस जवळ, दत्त झेरॉक्सच्या वरती, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६**

**सही/–**
**अॅड. स्वप्निल व्यं जाधव**
**बी.ए.एल.एल.बी.**
**( खरेदीदारचे वकिल)**

# सत्कर्मश्रद्धाश्रय (स्थापना १९८२)





*दुरितांचे तिमिर जावो ।*
*विश्वस्वधर्म सूर्ये पाहो ।।*
*जो जे वांछील तो ते लाहो।*
*प्राणिजात ।।*
*–संत ज्ञानेश्वर माउली*

आपल्या समाजातील गरजू दुर्बल–वंचित समाज बांधवांची यथाशक्ती सेवा करावी या उद्देशाने कार्यरत राहिलेली कारखान्यात काम करणाऱ्या सर्वसामान्य व्यक्तींनी स्थापन केलेली सत्कर्मश्रद्धाश्रय ही आपली सेवाभावी संस्था १९८२पासून कार्यरत आहे.

माथेरानच्या पायथ्याशी पनवेल तालुक्यातल्या बाबदेव वाडी–देहरंग परिसरातील विवेकानंद ग्राम येथे माऊली सेवा संकुलात संस्थेचे कार्य चालते. गोशाळा, विद्यार्थी वसतिगृह, आरोग्य केंद्र, औषधी वनस्पतींची व फलोद्यान लागवड, परिसरातील गावांमधील माता–भगिनी, समाज बांधव, विद्यार्थी वर्ग यांची यथाशक्ती सेवा, अशी आपल्या उपक्रमांची व्याप्ती आहे. त्यांचा थोडक्यात परिचय

**विद्यार्थी वसतिगृह :**

वनवासी भागातील तसेच आजुबाजुच्या अन्य क्षेत्रातील गरजू विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नयेत या उद्देशाने आपण १९९६ पासून येथे विद्यार्थी वसतिगृह चालवितो. सुमारे १५ ते २० विद्यार्थ्यांची येथे आपण सोय करू शकतो. त्यांचे निवास, भोजन, शिक्षण, व्यक्तिमत्व विकास, संस्कार इ. सर्व सुविधा निःशुल्क पुरविल्या जातात. आपल्या वसतिगृहात शिक्षण घेतलेले अनेक विद्यार्थी पुढील महाविद्यालयीन शिक्षण घेतात व नोकरी व्यवसाय उत्तम प्रकारे सांभाळतात असा अनुभव आहे.

**गोशाळा गोसंवर्धन :**

आजकाल गो विज्ञान या विषयात अखिल भारतीय स्तरावर मोठ्या प्रमाणात संशोधन व प्रयोग चालू आहेत. आपल्या सर्व सुविधांनी युक्त अशा गो शाळेत सुमारे २५ ते ३० देशी जातीच्या गायी, बैल व वासरे मिळून सुमारे ३५ संख्या आहे. परिसरातील हिरवा चारा वनस्पती यांच्या उपलब्धतेमुळे आपल्या गो–उत्पादनांचा दर्जा उत्तम प्रकारचा असतो असा सर्वत्र नावलौकिक आहे. आयुर्विज्ञान क्षेत्राला अपेक्षित असलेले देशी गार्गीचे मलोणकढेफ तूप, गोमूत्र अर्क, घनवटी, तक्रारिष्ट, मसाज तेल, गोमय साबण, सुगंधित अगरबत्ती अशी असंख्य दर्जेदार उत्पादने हा मुंबई–ठाणे रागयड परिसराचा आकर्षणाचा विषय झाला आहे. या उत्पादन प्रक्रियेतील दर्जाची शुद्धता काळजीपूर्वक सांभाळली जाते याचा प्रत्यय सर्वांना नेहमीच येतो.



**आरोग्य सेवा :**

१९९० सालापासून आपण या परिसरातील सुमारे २० पाड्यांवरील गरजू वनवासी बांधवांना आरोग्य सेवेचा लाभ देत आहोत. सुरूवातीच्या काळात अनेकांना खरूज सारख्या काही संसर्गजन्य रोगांची लागण झाल्याचे लक्षात आले. त्याच्यावर मात करण्यात आपल्या तज्ञ डॉक्टरांना यश आले. आता बदलत्या परिस्थितीत वाढता शैक्षणिक प्रसार, वाहतुकीच्या साधनांची उपलब्धता, आरोग्य विषयक जागरूकता व सेवाभावी तज्ञ डॉक्टरांची उपलब्धी या पार्श्वभूमीवर यथाशक्ती नैमित्तिक आरोग्य सेवा देण्याचा आपला प्रयत्न यशस्वीपणे चालू आहे.

**फलोद्यान, वनौषधी, रोपवाटिका लागवड :**

आपल्या केंद्र परिसरात आंबा, चिक्कू, पपई, पेरू, जांभूळ, सिताफळ, फणस इ. फळझाडांची लागवड व संगोपन केले आहे. संस्थेचे विद्यार्थी, हितचिंतक, देणगीदार व वेळोवेळी केंद्राला भेट देणारे पाहुणे या सर्वांना या फळांचा आस्वाद घेता येतो.

कोरफड, कडुनिंब, तुळस, गवती चहा, वाळा, वेखंड, मधुपर्णी (स्टिव्हिया), पारिजातक इ. वनौषधींची लागवड परिसरात केली आहे. कोरफड जेल, जास्वंद तेल, ओवा अर्क, इ. आपली आरोग्यदायी उत्पादने लोकप्रिय झाली आहेत. मधुमेही रुग्णांना उपयुक्त अशी मधुपर्णी (स्टिव्हिया) वनस्पतींची वाळवलेली पानेही आपण उपलब्ध करतो.

**कौशल्य विकास (स्किल डेव्हलपमेंट) :**

बदलत्या वातावरणात या विषयाचे महत्व लक्षात घेऊन आपल्या संस्थेने काही उपक्रम सुरू केले आहेत. परिसरातील सुशिक्षित महिलांना रोजगार उपलब्ध व्हावा म्हणून त्यांचेसाठी शिवणकला वर्ग सुरू केला आहे. या महिलांना प्रशिक्षित करून त्यांना स्वतःचा उद्योग सुरू करता यावा यासाठी त्यांना नवीन शिलाई मशिन मोफत दिले जाते. त्यासाठी अनेक दानशूर व्यक्तींचे सहाय्य प्राप्त होते. समाजाची गरज लक्षात घेऊन तज्ञ कार्यकर्त्यांच्या/प्रशिक्षकांच्या उपलब्धतेनुसार अन्य प्रकारचे कौशल्यविकासाचे प्रशिक्षण वर्ग सुरू करण्याचा संस्थेचा प्रयत्न/मानस आहे.

**समाज मंदीर :**

तळ मजल्यावरील प्रशस्त सभागृह, पहिल्या मजल्यावरील विद्यार्थी वसतिगृह, कार्यकर्त्यांचा निवास, भोजन गृह, बैठक कक्ष व सौर उर्जा यंत्रणा अशा प्रकारे समाजमंदिराची भव्य वास्तु उभी आहे. सभागृहात कौशल्य वर्ग, एनएसएस विद्यार्थ्यांचे शिविर, अशा प्रकारे विविध कार्यक्रमांसाठी आवश्यक अशा सुविधा उपलब्ध आहेत.

**अन्य सेवा उपक्रम :**

परिसरातील प्राथमिक माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, गणवेष वाटप, विविध पाड्यांवर दिवाळी फराळ वाटप, नैसर्गिक आपत्तीच्या वेळी आवश्यक ते सर्व मदतकार्य, वनवासी बांधवांना मध संकलना साठी प्रोत्साहन इ. प्रकारचे सेवा उपक्रम कर्तव्य भावनेने आपण करीत असतो.

**संस्थेची उत्पादने :**

आरोग्यदायी तूप, गोमूत्र अर्क, गोमय साबण, घनवटी, कोरफड जेल, जास्वंद तेल, ओवाअर्क, तक्रारिष्ट, खात्रीशीर मध, अगरबत्ती, ऋतुचक्रानुसार उपलब्ध चहाची पात, आंबेहळद, शेवग्याची शेंग इ.

**आगामी उपक्रम :**

आपल्या केंद्राच्या संपर्कात सुमारे २० पाडे आहेत. तिथल्या बांधवांच्या उत्कर्षासाठी अनेक उपक्रम करण्यासारखे आहेत. शहरी वस्तीतील सेवाभावी स्त्री–पुरुष नागरिकांचा अमूल्य वेळ व त्यांच्या ज्ञानाचा अनुभवाचा लाभ मिळाल्यास पुढील उपक्रम करणे आवश्यक व शक्य आहे.

१) भजनी मंडळींशी संपर्क धर्म जागरण

२) किशोरी विकासासाठी भगिनींशी संपर्क

३) ९वी, १०वी व ११वी, १२वी विद्यार्थ्यांसाठी साप्ताहिक शैक्षणिक मार्गदर्शन वर्ग

४) परिसरातील होतकरू तरुण–तरुणींसाठी कौशल्य विकास (स्किल डेव्हलपमेंट) वर्ग

५) परिसरातील पाड्यांवर जलसंवर्धनासाठी जनजागृती

(६) परिसरातील ग्रामपंचायत सदस्यांसाठी प्रशिक्षण वर्ग

विशिष्ट उपक्रमांची जबाबदारी घेऊन त्यासाठी पुढाकार घेऊन काम करणारे सेवाभावी स्त्री–पुरूष कार्यकर्ते लाभले तर हे सर्व करण सहज शक्य आहे व ती काळाची गरज आहे. याशिवाय शहरी भागात संस्थेसाठी निधी संकलन, उत्पादन विक्री, इ. साठी अनेकांचा सक्रीय सहभाग लाभावा हेच सर्वांना कळकळीचे आवाहन, आपला आजपर्यंतचा सक्रीय सहभाग व बहुमोल मार्गदर्शन यामुळेच एवढं कार्य होऊ शकलं. भविष्य काळातही आपलं भरीव सहकार्य लाभेल व पुढचं पाउल भक्कमपणे टाकता येईल हे निश्चित.

धन्यवाद !

संस्थेस दिलेल्या देणग्यांना आयकर कलम ८० जी अन्वये करसवलत उपलब्ध आहे.

संपर्कासाठी पत्ते


पनवेलः श्री. श्रीधर शंकर जोशी (८९७६३५३५६६) १०३, विश्वतारा सोसायटी, जुना ठाणा नाका रोड, सुशील गार्डन सोसा.च्या मागे. पनवेल–४१०२०६

ठाणेः श्री. मिलिंद श्रीकांत आठले (९३२४७६६००२) सी–३/२०४, व्हॅली टॉवर सोसायटी, खेवरा सर्कल, डी–मार्ट समोर, मानपाडा, ठाणे (पश्चिम) ४००६१०.

भारताचिया महारथाला सारे मिळूनी
ओढूया पायी गति अन् हाती शक्ती
हृदयी भक्ती जोडूया ।। वंदे मातरम् ।।

# द्रष्टा संन्यासी–विष्णुबुवा ब्रह्मचारी

विष्णुबुवांचा (विष्णू भिकाजी गोखले) जन्म २० जुलै १८२५ (अधिक श्रावण शुद्ध पंचमी) या दिवशी झाला. थोडे शिक्षण प्राप्त झाल्यानंतर वयाच्या ९ व्या वर्षी घर सोडून नोकरी धरली. १४ व्या वर्षी ब्रिटिशांच्या कस्टम खात्यात नोकरीला लागले, ७ वर्षे नोकरी केली. अंतरात्म्याच्या हाकेला प्रतिसाद देऊन नोकरीचा राजीनामा दिला आणि सप्तशृंगीच्या पर्वतावर ७ वर्षे कठोर तपश्चर्या केली,



तपश्चर्या फळाला आल्यानंतर श्रीदत्तात्रेयांनी दर्शन दिले आणि पुढचे जीवन ध्येय समजावून दिले. ते म्हणजे जनसामान्यांना वेदोक्त हिंदू धर्माचा खरा अर्थ सांगणे, त्यातील वाईट गोष्टी काढून टाकणे आणि हिंदुधर्मावर होणाऱ्या परधर्मीयांच्या आक्रमणाचा बिमोड करणे असे होते.

विष्णुबुवांनी या ध्येयपूर्तीसाठी पुढची १७ वर्षे अतोनात परिश्रम केले. स्वकीयांची आणि परकीयांची टीका सहन केली. त्यांच्या ४६ वर्षांच्या आयुष्यात असा एकही विषय नाही की ज्यावर त्यांनी लिहिले नाही किंवा भाष्य केले नाही. हिंदुधर्म रक्षण – प्रचार, जातीभेद – अस्पृश्यता निर्मूलन, विधवा पुनर्विवाह, विवाहाचे किमान वय, सक्तीचे शिक्षण, रोजगार निर्मिती, मनुष्य हितकारी राज्यव्यवस्था, निसर्ग – पशुधन संगोपन यांचा आग्रहाने पुरस्कार केला, त्यासाठी ग्रंथ लेखन, हजारो भाषणे, बैठका, लेख, प्रवचने केली आणि हिंदूंचे प्रबोधन केले. पंढरपूर, वाई, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, पुणे, अक्कलकोट येथे हिंदू धर्माच्या महत्तेवर व्याखाने दिली. भावार्थ सिंधू हा पहिला योगाधिष्ठित ग्रंथ लिहिला.

विष्णुबुवा सप्टेंबर १८५६ मध्ये गिरगाव – मुंबईत आले. त्यावेळी ब्रिटिश राजसत्तेच्या जोखडाखाली हिंदू समाज भरडून निघत होता, ख्रिस्ती मिशनऱ्यांनी हिंदूंच्या धर्मांतरणाचा मोठा डाव मांडला होता. हिंदू तत्वज्ञान, धर्म ग्रंथ, संस्कृती, देवदेवता, परंपरा यांची टिंगल टवाळी, अश्लील टीका सर्वमान्य झाली होती. ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या फसव्या प्रेमाला, सेवावृत्तीला बळी पडून हिंदू मोठ्या संख्येने ख्रिस्ती बनत होते. विष्णुबुवांनी ख्रिस्त्यांच्या या आक्रमणाचा प्रतिकार आपल्या भाषणांतून, बैठकांतून सुरू केला. बुवांच्या वक्तृत्वावर, ज्ञानावर, व्यक्तिमत्वावर लोक खुश होते. हजारोंच्या संख्येने लोक विष्णुबुवांना ऐकण्यासाठी येत असत. यामध्ये जॉर्ज बोवेन व जॉन विल्सन हे दोघे मिशनरी असत. १५ जानेवारी १८५७ ते २८ मे या कालावधीत प्रत्येक गुरुवारी विष्णुबुवा आणि ख्रिस्ती मिशनरी यांच्यामध्ये गिरगाव चौपाटीवर २० वादविवाद सभा झाल्या. या सभांवर Discussion By The Seaside हे पुस्तक मिशनऱ्यांनी छापले आहे. १८५९ मध्ये बुवांचा वेदोक्त धर्मप्रकाश हा प्रसिद्ध ग्रंथ प्रकाशित झाला.

१८६१ – ६३ मध्ये विष्णुबुवा हिंदुधर्म रक्षण – प्रचारासाठी तामिळनाडू, बंगाल, उत्तर प्रदेश, गुजरात येथे गेले आणि हिंदूंचे प्रबोधन करून ख्रिस्ती मिशनऱ्यांचा प्रतिवाद केला. वाराणसी येथे त्यांनी संन्यास घेतला. १८६७ मध्ये आदर्श राज्यव्यवस्थेची कल्पना मांडताना 'सुखदायक राज्यप्रकरणी निबंध' लिहून मानवी जीवन सुखी करणे हे राष्ट्रप्रमुखांचे ध्येय असले पाहिजे असे आग्रहाने सांगितले. १८७० – ७१ मध्ये भगवद्गीतेचे वैज्ञानिक दृष्टीने निरूपण केले. त्यांच्या मृत्यूनंतर 'सेतुबंधनी टीका' हा ग्रंथ प्रकाशित झाला. विष्णुबुवांना त्यांच्या कार्यात जगन्नाथ शंकरशेट, जीजीभॉय जमशेटजी, दादाभाई नौरोजी, इंग्रजी व्याकरणकार तर्खडकर आणि अनेक देशभक्त मंडळींनी साहाय्य केले. विष्णुबुवांचा मृत्यू १८ फेब्रुवारी १८७१ – महाशिवरात्रीला काळबादेवीच्या विठ्ठल मंदिरात झाला. त्यांच्या कार्यातून स्वातंत्र्य प्राप्तीसाठी अनेक थोर वाय्क्तीना प्रेरणा मिळाली.

वर्तमान काळात समाजाला अज्ञात राहिलेले विष्णुबुवांचे प्रेरणादायी चरित्र आणि कार्य समाजाला माहिती करून देण्यासाठी एप्रिल २०२२ मध्ये विष्णुबुवा ब्रह्मचारी सामाजिक केंद्राची स्थापना झाली. संशोधन, विष्णुबुवांच्या साहित्याचे पुनर्मुद्रण, प्रबोधन, सेवा आणि संघटन अशा विविध आयामांखाली केंद्राचे कार्य शिरवली, आसपासच्या उपेक्षित जनजाती वस्त्या आणि माणगाव, रोहा आणि सुधागड या तालुक्यांत चालू आहे.

शिरवली येथे विष्णुबुवांनी स्थापन केलेल्या श्रीदत्तगुरुंच्या पादुकांचे मंदिर बांधण्यात आले आहे. तेथे दैनंदिन पूजा आणि मासिक अभिषेक केला जातो. अभिषेकाचे यजमानपद विविध जातीतील बांधव स्वीकारतात. विष्णुबुवांचे ग्रंथ, लेख, त्यांच्यावरील झहऊ प्रबंध केंद्राच्या वेबसाईटवर डिजिटाइज्ड स्वरूपात दिले आहेत. गेले ३ वर्षे शिरवली परिसरातील शाळांतील सुमारे १००० मुलांना शैक्षणिक साहित्य पुरवले जाते आणि मार्गदर्शन केले जाते. कातकरी जनजाती वस्त्यांवर अभ्यासिका आणि संस्कारशाळा चालविल्या जातात. गेली दोन वर्षे शालाबाह्य विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका चालवून त्यांना दहावी बोर्ड परीक्षेसाठी मार्गदर्शन केले. त्यांच्या पुढील शिक्षणाची व्यवस्था केली. समाज प्रबोधनासाठी मान्यवरांची व्याख्याने आयोजित केली जातात. डेरवण येथील वालावलकर रुग्णालयाच्या सहकार्याने मोफत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. शिबिरात निदान झालेले तसेच हृदय शस्त्रक्रिया, कॅन्सर रुग्ण, अन्य गंभीर आजार असलेल्या रुग्णांना पुढील उपचारांसाठी डेरवणला पाठविले जाते. गेल्या वर्षी १००० जनजाती परिवारांना दिवाळी फराळ वाटप करण्यात आले. वृक्षारोपणाचे कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. या वर्षी १० च्या विद्यार्थ्यांसाठी व्यवसाय मार्गदर्शन शिबीर आयोजित करण्यात आले.

हे सामाजिक, सांस्कृतिक आणि राष्ट्रीय कार्य सुरु करण्यामागे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ प्रचारक श्री. मोरोपंत पिंगळे यांची प्रेरणा आहे. या कार्याला पू. सनातन स्वामी, पू. गोविंदेवगिरी महाराज, डॉ. अशोकराव मोडक, डॉ. सदानंद मोरे, डॉ. मुकुंद तापकीर, डॉ. राजा दीक्षित यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

हिंदू समाज जातीपातींमध्ये विभागला गेला होता, आपल्याला अस्पृश्यतेचा रोग जडलेला होता. या वाईट आणि हीन प्रथांमुळे आपण एकत्र राहिलो नाही आणि आपण स्वातंत्र्य गमावून बसलो, वेद –उपनिषदांनी दिग्दर्शित केलेला मार्ग अनुसरूनच समृद्ध आणि बलशाली भारताचे पुनर्निर्माण होईल असे सांगणाऱ्या, हिंदू एकत्वाचा आणि समरसतेचा, देव – देश आणि धर्मासाठी जीवनदान करण्याचा संदेश देणाऱ्या विष्णुबुवा ब्रह्मचारी यांचे द्विशताब्दी जन्मोत्सव वर्ष आहे. त्यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन !

**–सुरेश भास्कर गोखले**

# स्वच्छतादूताचा प्रामाणिकपणा! रोख रक्कम असलेली थैली केली परत



(संग्रहित)

**पनवेल : वार्ताहर**

गरिबी असली तरी स्वतःच्या मेहनतीने दोन वेळा ची चटणी भाकरी खायची ही आपली प्रवृत्ती आहे. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी पनवेल शहरातील मिरची गल्लीमध्ये एका व्यापाराचे दोन लाख ४६ हजार परत करून स्वच्छतादूताने प्रामाणिकपणाची संस्कृती दाखवून देत एक आदर्श वस्तूपाठ ठेवला.

ही दुनिया खूप स्वार्थी आहे असे आपण सहज म्हणतो. दुसऱ्याच्या संपत्तीवर डोळा ठेवून जगणारे सुद्धा खूप जण समाजामध्ये दिसून येतात, पण आपल्या अवतीभवती प्रामाणिक माणसं खूप असतात याची प्रचिती अनेकदा येते. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी पनवेल शहरांमध्ये मिरची गल्लीत रात्री आठ वाजण्याच्या सुमारात एका प्लास्टिकच्या पिशवीमध्ये दोन लाख ४६ हजार रुपयांचा बंडल गुंडाळलेल्या अवस्थेत रस्त्यावर पडल्याचे दिसून आले. त्याचवेळी पनवेल महानगरपालिकेची घंटागाडी त्या ठिकाणी कचरा संकलन करत होती. रस्त्यावर पडलेला प्लास्टिक पिशव्यांमधील नोटांचा जुडगा कचरा म्हणून स्वच्छतादूतांनी उचलला, मात्र तो जड असल्यामुळे त्यामध्ये नेमके काय आहे असा प्रश्न घंटागाडी कामगारांना पडला. त्यानुसार त्यांनी उघडून पाहिले असता त्यामध्ये पैशांचे बंडल आढळून आले, मात्र हे धन दुसऱ्याचे असून ही लक्ष्मी आपल्याला प्रसन्न होणार नाही हा प्रामाणिक विचार संबंधित स्वच्छतादूताच्या मनाला शिवला. त्याच वेळी एक व्यापारी धाय मोकलून रडत असल्याचे घंटागाडी कामगारांच्या निदर्शनास आले. त्याला विचारले असता माझे पैसे पडल्याचे तो म्हणाला.

किती पैसे हरवले आहेत अशी त्याला विचारणा केली असता त्याने रक्कम सांगितल्यानंतर हे पैसे त्याचेच आहेत हे खात्री स्वच्छतादूतांना पटली. त्यांनी लागलीच ही रोकड संबंधित व्यापाऱ्याला परत करत प्रामाणिकपणाचे दर्शन घडवले. संबंधित व्यापाऱ्याने त्यांचे आभार व्यक्त करत दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी स्वच्छता निरीक्षक महेंद्र भोईर घंटागाडी सुपरवायझर सनी बेद व कर्मचारी उपस्थित होते. याबाबत सर्व स्तरातून कौतुक करण्यात येत आहे.

# बालकांच्या हृदयविषयक आरोग्यावर चर्चासत्र

**नवी मुंबई : बातमीदार**

'आपल्या मुलांचे हृदय किती निरोगी आहे?' या विषयावर माहितीपूर्ण अशा वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चासत्रात डॉ. सारंग गायकवाड (बालरोगतज्ज्ञ आणि जीयूसीएच सर्जन) यांनी बालकांमधील हृदयविकाराविषयी सखोल माहिती दिली.

या वेळी बालकांमधील हृदयरोगाचे वेळेवर निदान होण्याचे महत्त्व तसेच प्रत्येक पालकाला किंवा मुलांना सांभाळणाऱ्या व्यक्तीला माहित हवीत. प्रत्येक शिक्षकाने सीपीआरचे तंत्र आत्मसात करणे गरजेचे आहे, कारण आपत्कालीन परिस्थितीत हे ज्ञान एखाद्याचे प्राण वाचवू शकते, असे डॉ. गायकवाड यांनी सांगितले. कुटुंबकल्याण मंत्रालयातर्फे 'सीपीआर जनजागृती दिवस साजरा केला जातो. त्यानुसार टार्गेट लर्निंग व्हेंचर्सद्वारे हे चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते.

डॉ. सारंग गायकवाड गेली वीस वर्षे बालहृदयशस्त्रक्रियेच्या क्षेत्रात कार्यरतबाहेत. या वेबिनारमध्ये डॉ. गायकवाड यांनी टार्गेट लर्निंग व्हेंचर्सने महत्त्वपूर्ण चर्चास्तर आयोजित केल्याबद्दल कौतुक केले.बालकांमधील हृदयरोगाचे वेळेवर निदान होण्याचे महत्त्व, नवजात बालकांमधील हृदयरोगाची लक्षणे जसे – दूध न पिणे, श्वसनास अडथळा, वजनवाढ न होणे इत्यादी समजावून सांगितले. याखेरीज, बालक व प्रौढांमध्ये सीपीआर देण्याच्या तंत्रामध्ये असणारा फरक त्यांनी स्पष्टपणे समजावून सांगितला. असे ते म्हणाले.

टार्गेट लर्निंग व्हेंचर्सचे संस्थापक संचालक अधिकारी दिलीप गंगारमानी म्हणाले की, आमचे उद्दिष्ट केवळ ज्ञान देण्यापुरते मर्यादित नाही, तर विद्यार्थ्यांशी, पालकांशी आणि शिक्षकांशी संपर्क साधून त्यांना गंभीर परिस्थितीत योग्य निर्णय घेण्याची क्षमता आणि समज देणे आहे. शिक्षणाच्या माध्यमातून आम्ही विद्यार्थ्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवत आहोत, असे दिलीप गंगारमानी म्हणाले.

# वाशी येथे बालनाट्य शिबिराचा शुभारंभ



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई बालारंगा भूमी आणि संत शिरोमणी कला मंच नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शुक्रवारी ज्येष्ठ अभिनेते सयाजी शिंदे यांच्या हस्ते वाशी विष्णूदास भावे नाट्यगृह तालीम हॉलमध्ये बालनाट्य अभिनय शिबिराचा शुभारंभ झाला.

विजय तेंडुलकर लिखित सखाराम बाईंडर या नाटकाचे दिग्दर्शक अभिजित झुंजारराव हेसुद्धा याप्रसंगी उपस्थित होते. यानिमित्ताने नाटककार श्रीहरी पवळे यांचे अभिनेते सयाजी शिंदे यांनी या शिबिराबद्दल कौतुक केले आणि विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.



# उद्यानाची वेळ वाढवण्याची मागणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

सानपाडा येथील उद्यानाची वेळ वाढवण्याची मागणी स्थनिक परिसरातील जेष्ठ नागरिक करत आहेत. येथील सेक्टर ७ मध्ये सीताराम मास्तर उद्यान असून या ठिकाणी मोठ्या प्रमाणात जेष्ठ नागरिकांची ये–जा असते. शिवाय या ठिकाणी भव्य असे विरंगुळा केंद्रदेखील महापालिकेमार्फत उभारण्यात आले आहे. त्यामुळे या जेष्ठ नागरिक विरंगुळा केंद्रात मोठ्या प्रमाणात ज्येष्ठ नागरिकांची वर्दळ असते. त्यामुळे येथील उद्यानाची वेळ वाढवण्यात यावी अशी मागणी शिवसेना नवी मुंबई उपजिल्हा प्रमुख मिलिंद सूर्यराव यांनी मनपा प्रशासनाकडे केली आहे.

येथील चालणाऱ्या आणि व्यायाम करणाऱ्या लोकांसाठी उद्यान पहाटे पाच वाजता उघडतात असले तरी अनेक ज्येष्ठ नागरिकांना एवढ्या सकाळी उद्यानात येणे शक्य होत नाही. शिवाय निवृत्त लोकांना घरातील कामकाजासाठी बाहेर पडणाऱ्या लोकांनंतरच आपले प्रातर्विधी उरकून बाहेर पडावे लागते. त्यामुळे अनेक ज्येष्ठ नागरिकांना उद्यानात येताना सकाळी १० वाजून जातात. त्यांनतर थोड्याच वेळात उद्यान बंद केले जात असल्याने या ठिकाणी केवळ हेलपाटा घालून घरी जावे लागत असल्याचची खंत ज्येष्ठ नागरिक व्यक्त करत आहेत.

ज्येष्ठ नागरिकांना विश्रांती, मनोरंजन आणि एकटेपणा घालवण्यासाठी या योजनेची सुरुवात नवी मुंबई महानगरपालिकेने केली. शहरात ठिकठिकाणी जवळपास ३४ विरंगुळा केंद्र उभारण्यात आली. त्यात सामाजिक संवाद, खेळ, वाचन आणि टीव्ही पाहणे अशा प्रकारचे साहित्य उपलब्ध करून देण्यात आले आहे, मात्र उद्यान उघडे ठेवण्याची पुरेशी वेळ दिली जात नसल्याने जेष्ठ नागरिकांनी वेळ वाढवून देण्याची मागणी मिलिंद सुर्यराव यांनी केली आहे.

# कोकणचा किनारा पुन्हा वादळाच्या सावटाखाली; मच्छीमार बांधव संकटात

## बोटी नांगरल्या किनारी, शासनाकडे विशेष पॅकेजची मागणी

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

कोकणचा किनारा पुन्हा एकदा वादळाच्या सावटाखाली आहे. समुद्रावर उग्र वादळी वारे वाहू लागल्याने रायगड जिल्ह्यातील मच्छीमार बांधवांनी आपल्या बोटी किनाऱ्यावर सुरक्षितपणे नांगरून ठेवल्या आहेत. दिघी, मुळगाव, जीवना बंदर, आगरदांडा, बागमंडला, श्रीवर्धन, वाशी, शेखाडी या किनारी भागांमध्ये बोटींच्या इंजिनांचा आवाज थांबला असून फक्त लाटांचा गडगडाट ऐकू येत आहे.





अजून तीन दिवस दक्षिणेकडील वादळी वारे असेच थैमान घालतील, अशी माहिती किनाऱ्यावरील अनुभवी बुजुर्ग मच्छीमारांनी दिली. त्यामुळे सध्या मचछीमार आपल्या फाटलेल्या जाळ्या शिवण्यात, बोटींची दुरूस्ती करण्यात आणि येणाऱ्या हंगामासाठी तयारी करण्यात व्यस्त आहेत.

वादळी वाऱ्यांमुळे समुद्रात जाणे धोकादायक ठरल्याने अनेक मच्छीमारांची उपजीविका ठप्प झाली आहे. काही दिवस समुद्र बंद राहिला की घरातील चूल विझते, बाजारात मासळी मिळत नाही, महिलांची रोजंदारी थांबते आणि संपूर्ण किनारपट्टीचे अर्थचक्र थबकते.

एका वृद्ध मच्छीमाराने व्यथित मनाने सांगितलं, बोट वाचवली खरी, पण पोट कसं भरायचं? जाळं सुकतंय, लेकरं भुकेली आणि बाजारात शांतता आहे. ही व्यथा केवळ एका मच्छीमाराची नाही, तर संपूर्ण कोकणातील हजारो कुटुंबांची आहे. डिझेल, बर्फ आणि अन्नसामुग्रीच्या वाढत्या किमतींनी मच्छीमारांच्या अडचणी अधिकच वाढवल्या आहेत. बोटींची दुरुस्ती, कर्जफेड आणि बँक हप्त्यांचा ताणही प्रचंड झाला आहे. अनेक ठिकाणी महिला मच्छीविक्रेत्या रोजंदारीशिवाय घर चालवण्याचा संघर्ष करत आहेत. या परिस्थितीत मत्स्यव्यवसायमंत्री नितेश राणे तसेच रायगडचे खासदार सुनील तटकरे आणि मंत्री अदिती तटकरे यांनी किनाऱ्यावरील या गंभीर संकटाची दखल घेऊन मच्छीमार बांधवांसाठी विशेष मदत पॅकेज जाहीर करावे, अशी एकमुखी मागणी मच्छीमार समाजाकडून होत आहे.

# शिवसेना उपजिल्हाप्रमुख रमेश मोरे कार्यकर्त्यांसह करणार राष्ट्रवादीत प्रवेश

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव येथील शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख रमेश मोरे यांचा कार्यकर्त्यांसह मुंबई येथे उपमुख्यमंत्री अजित पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे, माजी आमदार अनिकेत तटकरे, राष्ट्रवादी कोकण विभाग प्रवक्ते ॲड.राजीव साबळे यांच्या प्रमुख उपस्थितीत २८ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ४ वाजता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर पक्षप्रवेशाचा कार्यक्रम निश्चित झाला आहे.




या पक्षप्रवेशाबाबत प्रसारमाध्यमांना माहिती देताना रमेश मोरे यांनी सांगितले की, आपण राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या कार्यप्रणालीने प्रभावित होऊन राष्ट्रवादीच्या प्रवाहात दाखल होण्याचा निर्णय घेतला आहे. मी माझ्या मतदारसंघातील पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच माझी सर्व जवळची मित्रमंडळी यांच्याशी चर्चा करून शिवसेना पक्षाचा त्याग करण्याचा विचार केला. त्यानंतर आपल्या भागातील विकासकामे झाली पाहिजेत यासाठी आम्ही सर्वानी राष्ट्रवादी पक्षात सामील होण्याचे ठरविले. यानंतर दिवाळी सणात लक्ष्मी पूजनाच्या दिवशी सुतारवाडी येथे खासदार तटकरे यांच्या बंगल्यावर मी, खरवली सरपंच संतोष खडतर, उपसरपंच सुजित सकपाळ, ग्रामपंचायतीचे सदस्य शाखाप्रमुख व काही प्रमुख सहकारी यांनी त्यांची सदिच्छा भेट घेतली. आम्हा सर्वांचे स्वागत व सन्मान झाला.

खासदार तटकरे यांनी रमेश मोरे तुमचा व तुमच्या सर्व सहकाऱ्यांचा जाहीर पक्ष प्रवेश सोहळा लवकरच घेऊ असे सांगितले होते. त्यानुसार माझ्या सहकाऱ्यांचा, कार्यकर्त्यांचा, ग्रामस्थांचा पक्ष प्रवेश सोहळा मुंबई येथे मंगळवारी होणार आहे. या वेळी माझ्या समवेत खरवली सरपंच संतोष खडतर, उपसरपंच सुजित सकपाळ, ग्रामपंचायतीचे सदस्य शाखाप्रमुख यांच्यासह मोर्बा जिल्हा परिषद गटातील गावांमधील ग्रामस्थ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करणार, असे मोरे यांनी सांगितले.

# रोह्यातील स्मारके भविष्यात दीपस्तंभाप्रमाणे दिशा देणारी ठरतील –खासदार सुनील तटकरे

**रोहा : प्रतिनिधी**

रोह्याच्या वैभवमध्ये भर टाकणारी वास्तू उभी केली. कला, संगीत, स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण या बहुउद्देशीय इमारतीत होणार आहे. या संकुलाला प.पु. पांडुरंगशास्त्री आठवलेजींचे नाव देण्याचा मनात विचार आले. मानवतावादाचा विचार जगाला शास्त्रींजीनी दिले. वैचारिक स्वास्थ्य जगाला दिले. अशी माणसं होणे नाही. त्यांची स्मारके सगळ्यांना हेवा वाटेल असे रोह्यात उभारणार आहोत. ही स्मारके भविष्यातील काळात प्रेरणादायी दीपस्तंभाप्रमाणे दिशा देणारी ठरतील, असे खासदार सुनील तटकरे यांनी म्हटले.



रोहा अष्टमी नगर परिषदेच्या वतीने आरक्षण क्रमांक १४ येथील इमारतीस प.पु.पांडुरंगशास्त्री आठवले संकुल असे नामकरण करणे आणि मुख्य रस्त्यापासून मच्छी मार्केटसमोरून कुंडलिका नदीवर जाणाऱ्या कै. रामभाऊ शंकर दिवेकर मार्गाचे नव्याने झालेल्या सिमेंट काँक्रीट रस्त्याचे लोकार्पण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्या वेळी खासदार तटकरे बोलत होते.

या कार्यक्रमास महिला व बालकल्याणमंत्री आदिती तटकरे, राष्ट्रवादीचे प्रदेश उपाध्यक्ष मधुकर पाटील, मुख्याधिकारी अजयकुमार एडके, ॲड. प्रशांत देशमुख, मकरंद बारटक्के,शहर अध्यक्ष अमित उकडे, माजी नगराध्यक्ष समीर शेडगे, रत्नप्रभा काफरे, माजी नगरसेवक महेंद्र गुजर, राजेंद्र जैन, महेश कोलाटकर, अहमद दर्जी, चंद्रकांत पार्टे आदी उपस्थित होते.

मंत्री आदिती तटकरे यांनी, आजचा दिवस सर्वांसाठी अभिमानचा दिवस आहे. याआधी डॉ. चिंतामणराव देशमुख शहर सभागृहाचे उद्घाटन व त्यानंतर गॅलाक्सी हॉस्पिटलचे उद्घाटन झाले. या संकुलाला प.पु.पांडुरंगशास्त्री आठवले यांचे नाव देण्याचे खासदार सुनील तटकरे यांची इच्छी होती. या संकुलाला नाव देताना त्यांचे विचार नव्या पिढीला या माध्यमातून कळणार आहेत.या नामकरणातून अभिवादन होणार आहे, असे म्हटले.

ॲड. प्रशांत देशमुख यांनीही मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविकात मकरंद बारटक्के प.पु. पांडुरंगशास्त्री आठवले यांचा जीवनपट उलगडला. कार्यक्रमास नागरिक व स्वाध्याय परिवारातील सदस्य उपस्थित होते.

# आदिवासीवाडीवर कपड्यांचे वाटप

**पाली : प्रतिनिधी**

तिमिरातुनी तेजाकडे नेणारा सण म्हणजे दिवाळी, मात्र दिवाळीचा आनंद सर्वांनाच घेणे शक्य नसते. आदिवासी वाड्यापाड्यांवर तर दिवाळीला चांगले कपडेदेखील घालण्यासाठी नसतात. त्यामुळेच पालीतील संघर्ष सामाजिक संघटना व महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने सुधागड तालुक्यातील खडसांबळे आदिवासी वाडीवर जुन्या मात्र चांगल्या दर्जाच्या कपड्यांचे वाटप करण्यात आले.



या उपक्रमामुळे आदिवासी बांधवांना, लहानग्यांना दिवाळीला चांगले कपडे घालण्यासाठी मिळाले. त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलले. या वेळी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हा पदाधिकारी अमित निंबाळकर व माजी सरपंच विजय धानुधरे उपस्थित होते.

# 'ये शाम मस्तानी'ने रोहेकरांची दिवाळी सुरेल



**धाटाव, रोहा : प्रतिनिधी**

रोहा शहरात यंदाची दिवाळी संगीताच्या सुरेल झंकारात रंगून गेली. सुनील तटकरे युवा प्रतिष्ठान यांच्या वतीने डॉ. चिंतामणराव देशमुख नाट्यगृहात आयोजित 'गाता रहे मेरा दिल–सदाबहार हिंदी गाण्यांची मैफल' या कार्यक्रमाने रसिक रोहेकरांची मने जिंकली.

या कार्यक्रमाला खासदार सुनील तटकरे. राज्याच्या पर्यटन व महिला बालविकासमंत्री आदिती तटकरे यांची उपस्थिती लाभली.

या सुरेल मैफिलीत गायक संगिता मळेकर, राणा आणि जगदीश यांनी एकापेक्षा एक अमर हिंदी गाणी सादर करून वातावरण संगीतमय केले.

संपूर्ण मैफिलीचे संगीत संयोजन संदीप मयेकर यांनी उत्तमपणे हाताळले, तर कार्यक्रमाचे संयोजन आणि अँकरिंग अमित काकडे यांनी प्रभावीपणे केले. शेवटचा सूर 'आज कल तेरे मेरे प्यार के चर्चे हर जुबान पर' या गाण्याने लावण्यात आला आणि सभागृह टाळ्यांच्या गजरात दुमदुमून गेले. संगीतप्रेमी प्रेक्षकांच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमाने दिवाळीच अधिक गोड केली.

# पाचाड येथे कष्टकरी महिलांना भाऊबीज भेट

**पाली : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज यांनी जेथे अठरा पगड जातीच्या स्त्रियांचा सन्मान केला त्या पाचाडच्या राजमाता जिजाऊ यांच्या पवित्र समाधीस्थळी मावळा जवान संघटनेच्या वतीने शेकडो महिलांना साडीचोळीची भाऊबीज भेट देऊन राजमाता जिजाऊ यांना मानवंदना देण्यात आली.

मावळा जवान संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विजयमहाराज तनपुरे व कार्यवाह रोहित नलावडे यांच्या हस्ते पारंपरिक रिवाजात राजमाता जिजाऊ यांच्या समाधीचे पुजन करून प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. हर हर महादेव, जय जिजाऊ, जय शिवरायच्या जयघोषाने, पारंपरिक लोकगीतांनी परिसर दुमदुमून गेला होता.

पाचाड, रायगडवाडी, माणगाव, महाड, पोलादपूर, सिंधुदुर्ग, रत्नागिरी आदी ठिकाणच्या तीनशेहुन अधिक कष्टकरी महिलांचा साडीचोळीची भेट देण्यात आली. या अनोख्या भाऊबीज भेटीने महिला भारावून गेल्या. ज्येष्ठ इतिहास अभ्यासक दत्ताजी नलावडे यांनी आपल्या व्याख्यानानातुन राजमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजी यांच्या मानवकल्याणकारी कार्याचा महिमा सांगितला.



# माणगाव येथे चारिझेन फाउंडेशनच्या कार्यालयाचे उद्‌घाटन

**माणगाव : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील सेवाभावी संस्थांतर्फे एक ओळखल्या जाणाऱ्या चारिझेन फाउंडेशनच्या माणगाव कार्यालयाचे उद्‌घाटन पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमास भाजप प्रदेश महिला मोर्चा सचिव यशोधरा गोडबोले, उपनगराध्यक्ष हर्षदा काळे, राजिपचे माजी शिक्षण व आरोग्य समिती सभापती ज्ञानदेव पवार, विवा कॉलेजचे प्राचार्य विवेक ढेपे, केंद्रप्रमुख शंकर शिंदे, सामाजिक कार्यकर्ते सुमित काळे, युवा उद्योजक यश गोडबोले, ठाकूर तसेच नागरिक आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




या पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे आणि माजी सभापती ज्ञानदेव पवार यांनी फाउंडेशनच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याचे कौतुक केले. भाजप प्रदेश महिला मोर्चा सचिव यशोधरा गोडबोले यांनी सांगितले की, चारिझेन फाऊंडेशन ग्रामीण भागातील महिलांसाठी प्रेरणास्थान ठरत आहे. फाउंडेशनचे अध्यक्ष कॅप्टन निर्मलसिंग रंधावा यांनी म्हटले, चारिझेन फाऊंडेशनचे हे नवीन कार्यालय फक्त प्रशासकीय केंद्र नसून समाजसेवा, जनजागृती आणि ग्रामीण विकासाच्या दिशेने पुढील प्रवासाचे केंद्रस्थान ठरेल. आमचे उद्दिष्ट म्हणजे गावागावात सकारात्मक बदल घडविणे, युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे आणि महिलांना सशक्त बनविणे आहे. त्यांनी पुढे सांगितले की, लवकरच फाऊंडेशनतर्फे फार्मर फॉर फॉरेस्ट, महिला उद्योजकता प्रशिक्षण, युवा करिअर मार्गदर्शन, आरोग्य व स्वच्छता जनजागृती शिबिरे तसेच शैक्षणिक व पर्यावरणविषयक अभियान सुरू केले जाणार आहे. केंद्रप्रमुख शंकर शिंदे, संस्थेचे कोऑर्डिनेटर राकेश पडवळ व सभासद किशोर झेमसे यांच्यासह अनेकांनी मनोगत व्यक्त करीत फाऊंडेशनला शुभेच्छा दिल्या. या उदघाटनपर कार्यक्रमात फाऊंडेशनच्या मागील उपक्रमांचे दर्शन घडविणारे फोटो प्रदर्शनही भरविण्यात आले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार फाउंडेशनचे कोऑर्डिनेटर राकेश पडवळ यांनी केले.

# दिवाळीच्या सुट्टीत काशीद, मुरूड बीच पर्यटकांनी फुलले

**मुरूड : रामप्रहर वृत्त**

दीपावली सुट्टीचा आस्वाद घेण्यासाठी मुरूड तालुक्यातील काशीद, मुरूड बीचवर पर्यटकांची मोठी मांदियाळी उतरल्याचे शनिवारी रोजी दिसून आले.पहिली आंघोळ आणि लक्ष्मीपूजनाचा विधी उरकून मुंबई–पुणे, ठाणे, पश्चिम महाराष्टातुन असंख्य पर्यटक दीपावली सुट्टी समुद्रकिनारी एन्जॉय करण्यासाठी डेरेदाखल झाले आहेत.



पर्यटकांची सुमारे एक हजार वाहने परिसरात दाखल झाल्याचे काशीद येथील जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते सूर्यकांत जंगम आणि मुरूड येथील हिरा रेसिडेंसीचे मालक महेंद्र पाटील, साईगौरी रेस्ट हाऊसचे मालक आणि जिल्हा मच्चीमार संघाचे उपाध्यक्ष मनोहर बैले यांनी सांगितले. पर्यटकांनी समुद्रकिनाऱ्यावर फटाके फोडून दिवाळीचा आनंद लुटल्याचे श्री. बैले यांनी सांगितले.

नवरात्र उत्सवापर्यंत या भागातील पर्यटन पूर्ण थंडावले होते. त्यामुळे पर्यटन व्यावसायिक कमालीचे हवालदिल झाले होते. जंजिरा जलदुर्गाकडेदेखील पर्यटकांनी पाठ फिरवल्याचे दिसून आले होते. सर्वसामान्य पर्यटन व्यावसायिक तर हताश दिसून येत होता. दिवाळीच्या पाडव्याच्या दिवसापासून चित्र बदलून काशीद, मुरूड आदी समुद्रकिनाऱ्यावर पर्यटकांचा पूर लोटल्याचे चित्र दिसत आहे.पर्यटन व्यवसायाला पुन्हा उर्जितावस्था आली आहे. हाजारोंच्या संख्येने पर्यटकांची मांदियाळी समुद्रकिनारी आनंद लुटण्यासाठी उतरली आहे. ठिकठिकाणी निवास व्यवस्था, हॉटेलिंग गजबजून गेले आहेत. दिवाळी सुट्टी असल्याने पर्यटकांची हजेरी स्थिर राहील अशी माहिती महेंद्र पाटील, सूर्यकांत जंगम यांनी दिली. मुरूडमध्ये दरबार रोडवर असणाऱ्या हॉटेल शोअर लाईन या पूर्ण शाकाहारी हॉटेलला अनेक पर्यटकांनी भेट देत शुद्ध शाकाहारी स्वादिष्ट भोजनाचा आस्वाद घेतल्याचे हॉटेलचे मॅनेजर धर्मेश मोरे यांनी सांगितले.

पर्यटकांच्या वर्दळीने जंजिरा जलदुर्ग गजबजला आहे. राजपुरी जेट्टी, खोरा बंदर जेट्टी, दिघी बंदर जेट्टीवरून पर्यटकांना जंजिऱ्यात जाण्याची जलप्रवासाची सुविधा असून असंख्य पर्यटक जंजिरा पाहण्यासाठी येताना दिसत आहेत. सध्या हवामान उत्तम असून पर्यटनाला अनुकूल आहे.काशीद, नांदगाव, बारशिव समुद्रकिनाऱ्यावर येणारे विविध भागांतील पर्यटक जंजिरा पाहण्यासाठी हमखास येतात असे दिसून आले.

अनेक दिवस जंजिऱ्यावर पर्यटकांची संख्या रोडावली होती. अलिबाग – मुरूडचे पुरातत्व विभागाचे अधिकारी बजरंग येलीकर यांनी सकाळी सांगितले की, शनिवारी, रविवारी दोन दिवसात जंजिरा पाहण्यासाठी सुमारे पाच हजार पर्यटकांनी भेट दिली. जंजिऱ्यात प्रवेश करण्यासाठी प्रत्येक व्यक्तीला २५ रुपये तिकीट असून १५ वर्षाखालील मुलांना विनामूल्य प्रवेश आहे. ऑन लाईन तिकीट काढल्यास २० रुपये तिकीट आहे अशी माहिती येलीकर यांनी दिली.

नांदगाव येथील सिद्धिविनायक देवस्थान, मुरूड येथील श्री दत्त देवस्थान, साळाव येथील गणेश देवस्थानलादेखील पर्यटक भेटी देऊन दर्शनाचा लाभ घेत आहेत. पर्यटन व्यवसायिकांच्या अनुमानाप्रमाणे शालेय सुट्टी असेपर्यंत पर्यटकांची वर्दळ अशीच राहील. सुट्टीमुळे कुटुंबासमवेत शेकडो पर्यटक आल्याचे दिसत आहेत.

मुरुड समुद्रकिनारी नुकतेच सुरु झालेले पार्किंग मुले पर्यटकांची उत्तम सोया झाली आहे. पर्यटक हॉटेल मधून पार्किंगमध्ये येतात दोन पायऱ्या उतरल्यावर समुद्राच्या लाटांचा आनंद घेतात. किनारा सुशोभीकरांचा परिणाम पर्यटक वाढीवर नकीच झाला आहे. पर्यटकांनी दोन दिवस राहावे यासाठी पालिकेने पद्ममदुर्ग किल्ल्यात जयवहतूक सुरु करणे गरजेचे आहे. मुरुडच्या साईड सिन पाहण्यासाठी पालिकेची गाडी असली पाहिजे. दोन्ही किल्ले, कुंद्यामांदाड लेणी, दत्त मंदिर, इदगा, गारंबी ही स्थळे पाहण्यासाठी नियोजन होणे गरजेचे आहे.



# तिसऱ्या वनडेत भारताची सरशी

## रोहितची शतकी खेळी, विराटचे अर्धशतक



**सिडनी : वृत्तसंस्था**

तिसऱ्या वनडे सामन्यात भारताने ऑस्ट्रेलियाचा तब्बल नऊ विकेट्स राखून पारभव केला. भारताने मालिका गमावली असली तरी या वेदनेवर रोहित शर्माच्या शतकी अन् विराटच्या अर्धशतकी खेळीने फुंकर घातली गेली. ऑस्ट्रेलियाचे २३७ धावांचे आव्हान भारताने ३८.३ षटकात एका फलंदाजाच्या मोबदल्यात पार केले.

भारताकडून रोहित शर्माने नाबाद १२१ धावा, तर विराट कोहलीने नाबाद ७४ धावांची खेळी केली. कर्णधार शुभमन गिलने २४ धावांचे योगदान दिले.

ऑस्ट्रेलियचे २३७ धावांचे आव्हान घेऊन मैदानात उतरलेल्या भारतीय संघाने आक्रमक सुरूवात केली. रोहित आणि शुभमन गिलने ६९ धावांची सलामी दिली. हेजलवूडने कर्णधार गिलला २४ धावांवर बाद करत भारताला पहिला धक्का दिला.

गिल बाद झाल्यानंतर आलेल्या विराट कोहलीने सलग दोन भोपळ्यांचा डाग पुसून काढण्याच्या दृष्टिकोनातून फलंदाजी करण्यास सुरुवात केली. त्याने सेट झालेल्या रोहितला चांगली साथ देत भारताला शतकी मजल मारून दिली. रोहितने आपले सलग दुसरे अर्धशतक पूर्ण केलं. पाठोपाठ विराटनेदेखील अर्धशतकी खेळी केली. या दोघांनी दुसऱ्या विकेटसाठी नाबाद १६८ धावांची भागीदारी रचत भारताला षटकात विजय मिळवून दिला.

तत्पूर्वी, भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील तिसऱ्या आणि अखेरच्या वनडे सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करणाऱ्या ऑस्ट्रेलियाचा मनसुबा हा आक्रमक खेळून मोठी धावसंख्या उभारण्याचा होता, मात्र भारतीय गोलंदाजांनी मोक्याच्या क्षणी सेट झालेल्या फलंदाजांची विकेट घेत हा मनसुबा उधळून लावला. भारताने ऑस्ट्रेलियाला २३६ धावांत गुंडाळले.

'कांगारू'कडून मॅट रेनशॉने सर्वाधिक ५६ धावा केल्या. मिचेल मार्शने ४१, तर शॉर्टने ३० धावांचे योगदान दिले. भारताकडून हर्षित राणाने सर्वाधिक चार विकेट्स घेतल्या. त्याला वॉशिंग्टन सुंदरने दोन, तर सिराज, कृष्णा, कुलदीप यादव आणि अक्षर पटेल यांनी प्रत्येकी एक विकेट घेत चांगली साथ दिली. हा सामना जिंकून भारताने व्हाइटवॉश टाळला आहे.

# विविध क्रीडा स्पर्धांमध्ये चौक शाळेची दमदार कामगिरी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**



विविध शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये चौक येथील सरनौबत नेताजी पालकर विद्यामंदिर व यशवंतराव देशमुख कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी दमदार कामगिरी करून आपली छाप पाडली आहे.

मुंबई विभागस्तरीय स्क्रॅश स्पर्धेत १७ वर्षाखालील मुलींच्या गटात सोनिया वाघमारे हिने सुवर्णपदक पटकावले असून तिची व साहिल वाघमारे याची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

रायगड जिल्हा व खालापूर तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धांमध्येही चौक शाळेच्या संघांनी चमकदार कामगिरी केली. खो-खोमध्ये १४ वर्षाखालील मुले व मुलींचा संघ प्रथम, १७ वर्षाखालील मुले प्रथम, १७ वर्षाखालील मुली द्वितीय आणि १९ वर्षाखालील मुले व मुलींच्या संघाने द्वितीय क्रमांक प्राप्त केला. कबड्डीत १४ वर्षाखालील मुलींनी प्रथम व १७ वर्षाखालील मुलांनी द्वितीय क्रमांक मिळवला.

याशिवाय मैदानी स्पर्धांमध्येही शाळेच्या खेळाडूंनी १४, १७ व १९ वर्षाखालील वयोगटात एकूण १२ सुवर्ण, १६ रौप्य आणि आठ कांस्यपदके जिंकत शाळेचा झेंडा उंचावला आहे. या सर्व खेळाडूंना शाळेचे क्रीडा शिक्षक व प्रशिक्षक शरद कुंभार यांनी प्रशिक्षित केले असून त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय पातळीपर्यंत मजल मारली आहे.

शाळेच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल विद्या प्रसारिणी सभा चौक संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. अविनाश देशमुख, कार्याध्यक्ष शोभा देशमुख, उपकार्याध्यक्ष नरेंद्र शहा, सेक्रेटरी योगेंद्र शहा तसेच सर्व शिक्षकांनी खेळाडू व प्रशिक्षकांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# एमएनएम विद्यालयाचे ॲथलेटिक्स स्पर्धेत यश



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी अंतर्गत जिल्हास्तरीय ॲथलेटिक्स स्पर्धेत गोळाफेक, थाळीफेक, ८०० मीटर धावणे, रिले या विविध प्रकारांमध्ये मोरू नारायण म्हात्रे विद्यालय आणि तुकाराम नारायण घरत ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्सच्या विद्यार्थ्यांनी रौप्य व कांस्यपदके मिळविली. स्पर्धेचे आयोजन एचओसी स्कूल रसायनी येथील भव्य पटांगणावर करण्यात आले होते.

या स्पर्धेत थाळीफेकच्या १९ वर्षाखालील गटात पारस सचिन भोईर आणि १४ वयोगटाखालील गटात सुरज कुमार सिंगने रौप्यपदक पटकावले. प्रियांशू राजेश निषाद, स्मित कल्पेश पाटील, आकाश महिंद्र नाईक, तौफिक आलम अन्सारी व अंश मोकल या चमूने १७ वर्षाखालील मुलांच्या रिले स्पर्धेत रौप्यपदक पटकावले. त्याचप्रमाणे तौफिक आलम अन्सारी याने ८०० मीटर धावणेमध्ये कांस्यपदक मिळविले.

जिल्हास्तरीय स्पर्धेतील कामगिरीबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी विद्यार्थ्यांना पुढील विभागीय स्तराकरिता शुभेच्छा देत प्रोत्साहित केले. शाळेचे चेअरमन भार्गव ठाकूर, मुख्याध्यापिका सायली वडवलकर, तसेच माध्यमिक उच्च माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका प्रणिता गोळे, प्राथमिक विभागाचे पर्यवेक्षक अरुण जोशी आणि शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल कौतुक करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. क्रीडा शिक्षक वर्षा नलावडे, वामन कुऱ्हाडे यांनी विद्यार्थ्यांसाठी विशेष परिश्रम घेतले.

# अलाना किंगची 'सप्तरंगी' कामगिरी



**इंदूर : वृत्तसंस्था**

सेमी फायनलमध्ये प्रवेश केलेल्या ऑस्ट्रेलियाने अलाना किंगच्या दमदार प्रदर्शनाच्या बळावर दक्षिण आफ्रिकेचा डाव अवघ्या ९७ धावांतच गुंडाळला. अलानाने सात षटकात दोन निर्धाव षटकांसह १८ धावांच्या मोबदल्यात तब्बल सात विकेट्स पटकावल्या. वनडे वर्ल्डकपमधला एका डावात सर्वाधिक विकेट्स मिळवण्याचा विक्रम आता अलानाच्या नावावर आहे.

वनडे क्रिकेटमध्ये एका डावात सात विकेट्स पटकावणारी अलाना केवळ सहावी महिला क्रिकेटपटू आहे. याआधी साजिदा शहा, जेएम चेंबरलेन, अनिसा मोहम्मद, एलिसा पेरी, शेली निशके यांनी अशी कामगिरी केली आहे.

ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका या दोन्ही संघांनी याआधीच सेमी फायनलमध्ये प्रवेश केला आहे. त्यामुळे दोन्ही संघांसाठी हा सराव सामनाच होता, मात्र ऑस्ट्रेलियाने सेमी फायनलसाठी एकदम तय्यार असल्याचे दाखवून देत दक्षिण आफ्रिकेला शंभरीही गाठू दिली नाही.

# गव्हाण विद्यालयाचे मैदानी स्पर्धेत सुयश

## चार खेळाडूंची विभागीय पातळीवर निवड



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रसायनीतील पिल्लई कॉलेज येथे झालेल्या मुलांच्या रायगड जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेत रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण कोपर येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ. भगत ज्युनिअर कॉलेजच्या खेळाडूंनी एक सुवर्ण आणि तीन रौप्यपदकांची कमाई केली.

या मैदानी स्पर्धेत एकूण १२ खेळाडू सहभागी झाले होते. त्यापैकी चार खेळाडूंची निवड मुंबई विभागीय स्पर्धेसाठी झाली आहे. सादिक अकबर शेख (आठवी ब) याने १९ वर्षाखालील गटात पाच हजार मीटर चालणे शर्यतीत सुवर्णपदक, अंश संदीप जाधवने (आठवी ब) १४ वर्षाखालील गटात ८० मीटर हर्डल्समध्ये रौप्य, हातोडाफेकमध्ये पियुष निलेश कडू (अकरावी) १७ वर्षांखालील गटात आणि अजय नानू चौहान (अकरावी) याने १९ वर्षाखालील गटात रौप्यपदक मिळविले.

यशस्वी खेळाडू व मार्गदर्शक क्रीडाशिक्षकांचे विद्यालयाच्या स्थानिक शाळा समिती चेअरमन तथा रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत, स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर व विश्वनाथ कोळी, गव्हाण ग्रामपंचायतचे माजी उपसरपंच विजय घरत, प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे आदींनी अभिनंदन करून पुढील विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# विराटने सर्वाधिक वनडे धावांमध्ये संगकाराला टाकले मागे



**सिडनी : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेतील तिसऱ्या सामन्यात भारताचा स्टार फलंदाज विराट कोहलीने शानदार अर्धशतक झळकावत एक मोठा विक्रम आपल्या नावावर केला आहे. सिडनी क्रिकेट ग्राउंडवर खेळण्यात आलेल्या या सामन्यात कोहलीने ५६ चेंडूत चार चौकारांच्या मदतीने आपले अर्धशतक पूर्ण केले.

कोहलीने नाबाद ७४ धावा केल्या, ज्यात त्याला कर्णधार रोहित शर्माच्या १२१ धावांच्या शतकी खेळीची उत्कृष्ट साथ मिळाली. या खेळीदरम्यान ५४ धावा पूर्ण करताच विराट कोहलीने श्रीलंकेचा दिग्गज फलंदाज कुमार संगकारा याला मागे टाकले आणि एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करणाऱ्या खेळाडूंच्या यादीत दुसरे स्थान पटकावले.

कुमार संगकाराने ३८० डावांमध्ये १४ हजार २३४ धावा केल्या होत्या. आता विराट कोहलीने आपल्या २९३व्या डावात १४ हजार २५५हून अधिक धावा पूर्ण केल्या आहेत. सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम अजूनही मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर यांच्या नावावर आहे, ज्यांनी ४५२ डावांमध्ये १८ हजार ४२६ धावा केल्या आहेत.

### क्षेत्ररक्षणातही चमकदार कामगिरी

ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या तिसऱ्या आणि अंतिम एकदिवसीय सामन्यात भारतीय संघाने गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षणाच्या जोरावर दमदार पुनरागमन करत यजमान संघाला ४६.४ षटकांत केवळ २३६ धावांत गुंडाळले. या सामन्यात अनुभवी फलंदाज विराट कोहलीने क्षेत्ररक्षणात विक्रमी कामगिरी केली.

मागील दोन सामन्यांमध्ये फलंदाजीत अपयशी ठरलेल्या विराट कोहलीने आपल्या क्षेत्ररक्षणाने सर्वांचे लक्ष वेधले. त्याने सामन्यात एकूण दोन झेल घेतले. या कामगिरीसह विराट ऑस्ट्रेलियाच्या भूमीवर आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक झेल घेणारा परदेशी क्षेत्ररक्षक बनला आहे. कोहलीच्या नावावर आता ऑस्ट्रेलियात ३८ झेल झाले असून त्याने इंग्लंडच्या इयान बॉथम यांचा जुना विक्रम मोडला.

# कबड्डीपटू कृष्णाजी कदम यांचे निधन

**चौक, पनवेल : वार्ताहर**



पनवेल तालुक्यातील धरणा कॅम्प (करंजावडे) येथील राष्ट्रीय कबड्डीपटू कृष्णाजीराव वामनराव कदम यांचे अल्पशा आजाराने वयाच्या ६७व्या वर्षी निधन झाले. त्यामुळे कबड्डी क्षेत्रात आणि समाजात दुःखाचे सावट पडले आहे.

बाबाभाई या नावाने कबड्डी क्षेत्रात त्यांना हाक मारली जायची. त्यांचे कबड्डी खेळामधील जंप मारणे हे बघण्यास कबड्डीप्रेमी उत्सुक असायचे. सर्वप्रथम रायगड जिल्हा कबड्डी संघात त्यांची निवड झाली होती. त्यांनी अनेक जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धांमध्ये भाग घेतला. अनेक वेळा उत्कृष्ट खेळाडू म्हणून त्यांना सन्मानित करण्यात आले होते. रायगड जिल्ह्यात अग्रगण्य असणाऱ्या जय भवानी तरुण मंडळ कबड्डी संघाचे ते हुकमी अष्टपैलू खेळाडू होते.

कबड्डी खेळाच्या प्रभावामुळे व उत्कृष्ट खेळामुळे आयडीबीआय या नामांकित राष्ट्रीय बँकेने त्यांना आपल्या सेवेत दाखल करून घेतले. बँकेच्या कबड्डी संघातून खेळताना त्यांची राष्ट्रीय कबड्डी संघात निवड झाली. राष्ट्रीय संघातून खेळताना त्यांनी अनेक कबड्डी खेळाडू घडविले. बँकेच्या वतीने व्यावसायिक गटात कबड्डी खेळू लागले. त्यांना अनेक कंपनी, बँक येथून त्यांच्या संघात खेळण्याची संधी आली, परंतु त्यांनी ती नाकारून वयाच्या ६०व्या वर्षी ते आयडीबीआय बँकेतून सेवा निवृत्त झाले. त्यानंतर त्यांनी कबड्डी खेळासाठी तरुणांना मार्गदर्शन केले, अनेक खेळाडू घडविले. त्यांच्या मागे धर्मपत्नी, दोन मुलगे व भाऊ आहेत.

कै. कृष्णाजीराव यांचा दशक्रिया विधी २९ ऑक्टोबर रोजी भोलेनाथ मंदिर पिसार्वे तलाव येथे, तर उत्तरकार्य धरणा कॅम्प भवानीनगर येथे ३१ ऑक्टोबर रोजी होणार आहे.

# हर्षित राणाने कोच गंभीरचा विश्वास ठरवला सार्थ



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघाचा प्रशिक्षक गौतम गंभीरने ज्या युवा हर्षित राणावर भरवसा दाखवला त्या पठ्ठ्याने तिसऱ्या वनडे सामन्यात भेदक मारा करत ऑस्ट्रेलियन संघाचे कंबरडे मोडले. हर्षितने घेतलेल्या चार विकेट्सच्या जोरावर भारतीय संघाने पहिल्यांदा फलंदाजीचा निर्णय घेतलेल्या ऑस्ट्रेलियाला २३६ धावांत गुंडाळले आणि नंतर माफक आव्हान पार करून विजय मिळवला.

पहिल्या दोन सामने जिंकून मालिकेत २-० अशी आघाडी घेतलेल्या ऑस्ट्रेलियाला तिसऱ्या सामन्यात ५० षटकेही खेळता आली नाहीत. युवा वेगवान गोलंदाज हर्षित राणाने आपल्या स्पेलमध्ये प्रभावी मारा करत एकूण चार महत्त्वाच्या विकेट्स घेतल्या. हर्षितशिवाय वॉशिंग्टन सुंदरने दोन, तर मोहम्मद सिराज, प्रसिद्ध कृष्णा, कुलदीप यादव आणि अक्षर पटेल यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

३८ व्या षटकात हर्षित राणा पिक्चरमध्ये आला. सुरुवातीच्या षटकात विकेटसाठी संघर्ष करणाऱ्या हर्षितने कॅरीच्या रूपात या सामन्यात विकेटच खाते उघडले. श्रेयस अय्यरने एका अप्रतिम कॅचसह या विकेटमध्ये मोलाची भूमिका बजावली. हर्षितनेच जोश हेजवूडच्या रुपात शेवटची विकेट घेत ऑस्ट्रेलियाचा खेळ २३६ धावांवर खल्लास केला. विकेट घेत राणानं या सामन्यात चार विकेट्सचा डाव साधला.

ऑस्ट्रेलिया दौऱ्यात हर्षित राणा फक्त गंभीरमुळे संघात आहे, अशी टीका झाली होती. या पठ्ठ्याने ८.४ षटकांत फक्त ३९ धावा खर्च करत चार विकेट्सचा डाव साधत टीकाकारांना कडक प्रत्युत्तर देत गंभीरचा विश्वास सार्थ ठरवल्याचे पहायला मिळाले.

# रोहितचा आणखी एक हिट शो!

## ■ ऑस्ट्रेलियाविरुद्ध वनडेत २५०० धावांचा टप्पा पार

**मुंबई : प्रतिनिधी**



ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या तिसऱ्या आणि अखेरच्या वनडे सामन्यात हिटमॅन रोहित शर्माच्या भात्यातून सलग दुसरे अर्धशतक पाहायला मिळाले. वनडे कारकिर्दीतील ६०व्या अर्धशतकासह रोहित शर्माने आणखी एक खास विक्रम आपल्या नावे केला आहे.

सिडनीच्या मैदानात रोहित शर्माने ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या वनडेत २५०० धावांचा टप्पा पार केला. मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरनंतर ऑस्ट्रेलिविरुद्धच्या वनडेत भारताकडून हा पल्ला गाठणारा तो दुसरा फलंदाज ठरला आहे.

ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या वनडे सामन्यात २५०० धावांचा पल्ला गाठत खास विक्रम नोंदवणाऱ्या रोहितने ॲडलेड येथील ओव्हलच्या मैदानातही मोठा पराक्रम करून दाखवला होता. ऑस्ट्रेलिया दौऱ्यातील याआधीच्या अर्धशतकी खेळीत त्याने ऑस्ट्रेलियन मैदानात त्यांच्याचविरुद्धच्या वनडेत एक हजार धावा करण्याचा डाव साधला होता. अशी कामगिरी करणारा तो पहिला भारतीय ठरला होता. टी-२० आणि कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यावर वनडे कारकिर्दीवर प्रश्नचिन्ह उपस्थितीत केले जात होते, पण ऑस्ट्रेलिया विरुद्धच्या वनडे मालिकेतील बॅक टू बॅक दमदार खेळीसह त्याने आगामी वनडे वर्ल्डकप स्पर्धेत खेळण्याची आस कायम असल्याची खेळी करून दाखवली आहे.

### विराट कोहलीनेही साधला डाव

रोहित शर्मापाठोपाठ विराट कोहलीनं सिडनीच्या मैदानात अर्धशतकी खेळी साकारली. दोन सामन्यातील फ्लॉपशोनंतर केलेल्या या कामगिरीच्या जोरावर विराटनेही ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या वनडेत २५०० धावांचा आकडा गाठला आहे. सचिन तेंडुलकर आणि रोहित शर्मापाठोपाठ या यादीत विराट कोहली तिसरा भारतीय आहे, ज्याने ऑस्ट्रेलियन संघाविरुद्धच्या वनडेत २५०० धावांचा पल्ला पार केला आहे.

# शौर्या अंबुरेला रौप्यपदक

**रिफा (बहारीन) : वृत्तसंस्था**



भारताची १६ वर्षीय धावपटू शौर्या अंबुरे (महाराष्ट्र) हिने येथे सुरू असलेल्या आशियाई युवा क्रीडा स्पर्धेमध्ये १०० मीटर अडथळा शर्यतीत रौप्यपदक जिंकून आपला उत्कृष्ट फॉर्म कायम राखला आहे. अंतिम फेरीत तिने १३.७३ सेकंद अशी वैयक्तिक सर्वोत्तम वेळ नोंदवत मोठी कामगिरी केली.

शौर्यासाठी हे रौप्यपदक खूप महत्त्वाचे ठरले, कारण यंदाच्या हंगामातील हे तिचे तिसरे मोठे आंतरराष्ट्रीय पदक आहे. यापूर्वी तिने भुवनेश्वर येथील राष्ट्रीय ज्युनियर ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये सुवर्णपदक जिंकले होते. आशियाई १८ वयोगटाच्या चॅम्पियनशिपमध्ये कांस्यपदक मिळवले होते. आशियाई स्पर्धा सुरू होण्यापूर्वी तिची हीटमधील वेळ १४.०० सेकंद होती, परंतु अंतिम फेरीत तिने १३.७३ सेकंदांपर्यंत सुधारणा केली, जी तिचा दबावाखाली सर्वोत्तम कामगिरी करण्याचा आत्मविश्वास दाखविते.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मताले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com